नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १५७ * * अमरावती * बुधवार, दिनांक १० डिसेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## दिल्ली न्यायालयाची सोनिया गांधींना नोटीस

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९ :
दिल्लीतील राऊस अॅव्हेन्यू कोर्टाने काँग्रेस खासदार सोनिया गांधी यांना नोटीस बजावली आहे. ही नोटीस एका याचिकेवर आली आहे, ज्यात दावा करण्यात आला आहे की सोनिया गांधींचे नाव १९८०-८१ च्या मतदार यादीत चुकीच्या पद्धतीने जोडले गेले होते.

याशिवाय, याचिकेत दंडाधिकाऱ्यांच्या त्या निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे, ज्यात सोनिया गांधींविरोधात दाखल केलेली तक्रार फेटाळण्यात आली होती. कोर्टाने या प्रकरणात राज्य सरकारलाही नोटीस बजावली आहे आणि संपूर्ण प्रकरणाचे रेकॉर्ड मागवले आहे. पुढील सुनावणी ६ जानेवारी रोजी होईल.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## मानवतेचा झरा थांबला

काल डॉक्टर बाबा आढाव यांचे निधन झाले. बाबांचे निधन म्हणजे कष्टकऱ्यांच्या कैवाऱ्याचे निधन आहे. काही दिवसांपूर्वी त्यांचे सहकारी पन्नालाल सुराणा यांचेही निधन झाले आणि आता बाबा आढावही गेले. कष्टकरी, कामगार आणि तळागाळातील जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडून विधायक कार्य उभे करणारा लढाऊ आणि तेवढाच ममताळू दीपस्तंभ कोसळल्यासारखे वाटते आहे. अतिशय शास्त्रशुद्ध विचार, जातीवादाला प्रखर विरोध, विज्ञानाचा पांथस्थ आणि आयुष्यभर कष्टकऱ्यांच्या जीवनात चांगले दिवस आणण्यासाठी सदैव तळमळीने उभा राहणारा त्यासोबत कष्टाळूंवर सच्ची श्रद्धा असणारा, महात्मा फुले ते महात्मा गांधी यांच्या थोर विचारांचा अंगीकार करणारा बाबा आता या जगात नाही, हे आपले दुर्भाग्य आहे. मानवाचे आयुष्य शंभर वर्षांचे असते, मात्र ६०-७० वर्षानंतर सामान्य माणूस जवळजवळ मेलेला असतो. त्याला निवृत्तीचे वेध लागलेले असतात पण बाबा आढाव वयाच्या पंचान्नवाव्या वर्षापर्यंत तरुणासारखे तरुणाईग्रस्त होते, ही त्यांची ग्रस्तता म्हणजे आयुष्यभर गोरगरिबांसाठी काम करणारी व्यस्तता होती. चार वर्षांपूर्वी त्यांना कर्करोग झाल्याचे निदान झाले होते. त्या कर्कालाही त्यांनी जुमानले नाही अगदी काल-परवापर्यंत ते सक्रिय होते. सामाजिक न्याय आणि श्रमिकांचे हक्क याच्यासाठी त्यांनी कर्करोगालाही हुलकावणी दिली. माणसाने एका आयुष्यात किती संस्था स्थापन कराव्या आणि त्याही जिथून कवडीचीही उत्पन्नाची अपेक्षा नसेल. मात्र त्या संस्थांमधून कष्टकऱ्यांच्या जीवनातला अंधार दूर करण्याचा प्रयत्न करणारा हा महान डॉक्टर एकच. पुण्यातील मजूर वस्त्या, रिक्षा चालक, हॉटेल कामगार, बांधकाम मजूर, अशांसाठी त्यांनी कष्टकरी संघटना स्थापन केली. त्याआधी १९६३ साली त्यांनी हमालांसाठी हमाल पंचायतीची स्थापना केली त्यामुळे माथाडी कामगारांना अनेक हक्क मिळाले. त्यांच्या प्रयत्नामुळे असंघटित कामगारांनाही विमा, पेन्शन, आरोग्यासह इतर विशेष सुविधा मिळाल्या. त्यांनी केवळ एवढेच काम केले नाही तर ते अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सक्रिय सदस्य होते. डॉक्टर नरेंद्र दाभोळकर यांच्याबरोबर अंधश्रद्धा, जादूटोणा आणि अन्याय याविरुद्ध त्यांनी जोरदार प्रतिकार केला. ते धाराप्रवाही वक्ते होते, महात्मा फुले यांची सत्यशोधक विचारसरणीचे पाईक आणि अनुयायी सुद्धा होते. जातीय भेदभाव आणि सामाजिक अन्याय विरुद्धचा त्यांचा लढाऊ बाणा सर्वांनाच ठाऊक आहे. त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्नही हाती घेतले ग्रामीण विकासाकडे लक्ष दिले. शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतमालाला योग्य बाजारभाव आणि पाणी पुरवठ्यासाठी त्यांनी आंदोलने केली. एक गाव एक पाणवठा, ही त्यांची मोहीम महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सामाजिक समतेची प्रत्यक्ष साक्ष होती. बाबा आढाव म्हणजे कष्टकऱ्यांसाठी आपला चालता बोलता आयुर्वेदिक दवाखाना बंद करणारे अवलिया होते. बाबा आढाव पन्नालाल सुराणा यांच्याप्रमाणे निवडणुकीच्या रिंगणात यशस्वी होऊ शकले नाहीत पण कष्टकऱ्यांच्या अंगणात ते त्यांचे तारणहार बनून सदैव उभे राहिले. थोर समाजवादी नेते एसेम जोशी, ना. ग. गोरे आणि राम मनोहर लोहिया यांच्या विचारांचे ते सच्चे अनुयायी होते. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करणाऱ्या हमीद दलवाईंचे बाबा आढाव खंदे समर्थक होते. ते केवळ लढाऊ नेतेच नव्हते तर मानवतेचे विद्वान विचारवंत होते. आम्ही वर नमूद केल्याप्रमाणे आयुष्याच्या अखेरपर्यंत हा सूर्य कधीच थांबला नाही, त्यांच्या पुरोगामी विचारांची धाराही कधी थांबली नाही. अशा या वादळाला कुठे किनाराही सापडला नाही. आपल्या जीवनाचे सार्थक करणारे आणि पंच्यान्नवाव्या वर्षीही तारुण्यात जगणारे बाबा आढाव कष्टकऱ्यांच्या हृदयात सदैव जिवंत राहतील. दै. महासागर परिवारातर्फे या महान मानवाला विनम्र शोकांजली!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# कॅश व्हिडीओचा बॉम्ब!

### हिवाळी अधिवेशनात पैशांच्या बंडलांचा स्फोट : अंबादास दानवेनंतर संदीप देशपांडेंचा गंभीर दावा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
महाराष्ट्राच्या राजकारणात सकाळपासून मोठ्या खळबळजनक घटना समोर आल्या आहेत. मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांकडून आज सलगपणे दोन थरारक व्हिडीओ समोर आणण्यात आले. ज्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकातील संघर्ष एका नव्या उंबरठ्यावर पोहोचल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत.

एका बाजूला शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटातील आमदार महेंद्र दळवी हे मोठ्या रकमेच्या बंडलांसह दिसत असल्याचा दावा करत एक व्हिडीओ सार्वजनिक केला. तर दुसऱ्या बाजूला मनसे नेते संदीप देशपांडे यांनी राज्यातील पीडब्ल्यूडी विभागातील अधिकाऱ्यावर थेट लाचखोरीचे आरोप करत व्हिडीओच्या माध्यमातून भ्रष्टाचाराचा नवा पुरावा उघडकीस आणला.

शिंदे गटातील आमदार महेंद्र दळवी यांचा व्हिडीओ हा वेगळाच राजकीय स्फोट ठरत आहे. दळवी हे एखाद्या टेबलावर ठेवलेल्या नोटांच्या जाडजूड बंडलांची मोजणी करत असल्याचे व्हिडीओत दिसते, असा दावा अंबादास दानवे यांनी केला असून, त्यांनीच हा व्हिडीओ प्रथम ट्विटरवर पोस्ट केला.



त्यामुळे राज्य सरकारवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी राज्याकडे पैसे नसताना, आमदारांकडे इतका पैसा कुठून येतो? दानवे यांनी उपस्थित केलेला हा सवाल आता राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे.

दळवी यांनी स्वतःवरचे आरोप नाकारत, व्हिडीओ मॉर्फ केला आहे. चेहरा पूर्ण दिसेल असा व्हिडीओ दाखवा, मग मी आमदारकीचा राजीनामा देईन, असे प्रत्युत्तरही त्यांनी दिले. मात्र, या व्हिडिओंच्या संघर्षात सत्य काय? हे मात्र अद्याप स्पष्ट झालेले नाही.

दरम्यान, दानवे यांच्या या कॅश व्हीडिओ बॉम्बने हिवाळी अधिवेशनात खळबळ उडाली असून, वातावरण तापल्याचे दिसत आहे.

संदीप देशपांडे यांनी पत्रकार परिषद घेऊन पीडब्ल्यूडीच्या हाफकीन शाखेतील एका अभियंत्यावर गंभीर आरोप केले आहेत. शासनाकडून मिळणारा निधी मंजूर व्हावा, यासाठी कंत्राटदारांकडून थेट रोख रकमेत टक्केवारी उकळली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

त्यांच्या मते, २ लाख ८० हजार रुपयांची मागणी केवळ निधी प्रक्रिया पुढे नेण्यासाठी केली जाते. पूर्वी फक्त कंत्राट मिळाल्यावर भ्रष्टाचाराचा व्यवहार होत असे; परंतु आता ही बाब तीन टप्प्यांत विभागली गेली असून, कामाचं तत्कालिन आदेश (वर्क ऑर्डर), अंतिम बिल आणि निधी मंजुरी. प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र टक्केवारी घेतली जाते, असे देशपांडे यांनी स्पष्ट केले.

त्याहूनही विचित्र बाब म्हणजे, यात टक्केवारीच्या व्यवहारात बोली लावली जाते, असा धक्कादायक दावा त्यांनी केला. व्हिडीओ सार्वजनिक करताना त्यांनी सांगितले की, हा फक्त पहिला भाग असून, पुढील काही दिवसांत अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पुरावे लोकांसमोर आणले जातील.

देशपांडे यांच्या म्हणण्यानुसार, हा व्हिडीओ वरळीतील शाखेचा असून, तेथून निवडून गेलेले आमदार म्हणजे शिवसेना नेते आदित्य ठाकरे आहेत.

देशपांडे यांनी आदित्य ठाकरे यांनी अधिवेशनाच्या सभागृहात हा विषय उपस्थित करावा, अशी मागणीही केली. टक्केवारी देऊनही कंत्राटदारांना पैसे मिळत नाहीत. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, अनेक कंत्राटदार आज आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत, असा दावा त्यांनी केला.

### अंबादास दानवेंचा ब्लॅकमेलचा धंदा



या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना आमदार महेंद्र दळवी यांनी संपूर्ण व्हिडीओ बनावट आणि बदललेला असल्याचा दावा केला आहे. ते म्हणाले की, हा व्हिडीओ माझ्याशी संबंधित नाही. अंबादास दानवे यांनी माझा चेहरा दिसेल अशा स्वरूपात संपूर्ण व्हिडीओ दाखवावा. जर मी त्या व्हिडीओमध्ये कुठेही दिसलो, तर मी कोणत्याही क्षणी आमदारकीचा राजीनामा देईन. या व्हिडीओमध्ये लाल टी-शर्ट घातलेला व्यक्ती कोण आहे? दानवे यांनीच सांगावे.
दळवी यांनी अंबादास दानवे यांच्यावर वैयक्तिक टीकाही केली आहे. अंबादास दानवे यांना पक्षात कोणी विचारत नाही. ब्लॅकमेल करणे हा त्यांचा व्यवसायच झालाय. कोणत्या व्यक्तीने त्यांना यासाठी सुपारी दिली ते त्यांनी सांगावे, असे दळवी यांनी तिखट शब्दांत म्हटले.

## कापसाची माळ घालून विरोधक पायरीवर



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
अधिवेशनातील दुसऱ्या दिवशी विरोधक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक झाले. त्यांनी विधानभवनाच्या पायरीवर कापसाच्या माळा गळ्यात घालून सरकार विरोधात घोषणाबाजी केली.

विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले. कर्जमाफी, कापूस-सोयाबीनला भाव मिळावा अशी मागणी करत त्यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी त्यांनी हे फडणवीस नव्हे तर फसणवीस सरकार आहे, असा आरोप लगावला.

सोयाबीनला नाही भाव, सत्तेसाठी महायुतीची धावाधाव, सोयाबीनला नाही भाव, फडणवीस म्हणतात तुलाच ठाव, कर्जबाजारी शेतकऱ्याला तर देतंच नाय, अर्थमंत्र्यांच्या खिशात पैसाच नसतोय, पॅकेज फडणवीसांचं फसवंच असतंय... आदी बॅनर हातात घेऊन विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांकडे कुच केले. यावेळी शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळालीच पाहिजे, ह्यकापूस-सोयाबीनला भाव मिळाला पाहीजे, आदी मागण्या करण्यात आल्या.

यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेस शपचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, शिवसेना उबाठाचे युवा नेते आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, सुनील प्रभू, सचिन अहिर, वरुण सरदेसाई, सिद्धार्थ खरात, प्रवीण स्वामी, काँग्रेसचे सतेज पाटील, अस्लम शेख आदींची उपस्थिती होती.

## आपल्याच आमदारावर संतापले सीएम

### लाडकी बहिणीचा संबंध जोडण्यावर दिला घरी बसावे लागण्याचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज विधानसभेत प्रत्येक गोष्टीशी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा संबंध जोडणाऱ्या भाजपच्या एका आमदारावर चांगलेच संतापले.

प्रत्येक गोष्टी लाडकी बहीण आणू नका. लाडक्या बहिणींच्या विरोधात जाऊ नका, अन्यथा घरी बसावे लागेल, असे ते म्हणाले.

भाजप आमदार अभिमन्यू पवार यांनी आज सभागृहात अवैध दारू विक्रीचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, अवैध दारू विक्रीवर मी मागील सरकारमध्ये एक आणि आता एक लक्षवेधी मांडली. आपल्या दालनामध्येही तीन बैठका झाल्या. पण त्यावर अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही.

हा ग्रामीण भागातील प्रत्येक आमदाराचा विषय आहे. त्यांना रोज काय त्रास होतो? हे त्यांना विचारा. लाडक्या बहिणींवर आपण नेहमी बोलतो. पण लाडक्या बहिणींचे दुःख काय असेल, तर अवैध दारू विक्रीवर आळा घालावा हे आहे.

पवार पुढे म्हणाले, आपण उत्पादन शुल्क, गृह विभाग तथा अन्न व औषध प्रशासन विभागालाही निर्देश दिले. अध्यक्षांनी निर्देश दिल्यानंतरही काही कारवाई होत नसेल तर हा चिंतेचा विषय आहे.

अभिमन्यू पवार यांच्या या विधानावर मुख्यमंत्री चांगलेच संतापले. ते संतापाच्या सूरात म्हणाले, मी सदस्यांना पुन्हा सांगतो. प्रत्येक गोष्टीत लाडकी बहीण आणू नका. लाडक्या बहिणींच्या विरोधात जाऊ नका. अन्यथा आपल्याला घरी बसावे लागेल.
प्रत्येक गोष्टीत लाडकी बहीण - लाडकी बहीण करणे योग्य नाही. लाडक्या बहिणींचे पैसे चालूच राहतील. ती योजना सुरूच राहील. त्या योजनेची दुसऱ्या योजनांशी तुलना करता येत नाही, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी आपल्याच आमदाराला सुनावले.

## लाडक्या बहिणींसाठी पुन्हा निधी वळवला

### सामाजिक न्याय विभागाकडून ६७१.३५ कोटी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
राज्यातील सामाजिक न्याय व महिला-बाल विकास, आदिवासी विकास अशा महत्त्वाच्या विभागांनी पुन्हा एकदा माझी लाडकी बहीण योजनेसाठी मोठी आर्थिक तरतूद मंजूर केली आहे.

विधानसभेत सादर झालेल्या पुरवणी मागणीप्रमाणे, या योजनेसाठी विविध विभागांकडून एकत्रितपणे हजारो कोटींची रक्कम घेण्यात आली आहे. यामध्ये सामाजिक न्याय विभागाकडून ६७१.३५ कोटी, महिला व बाल विकास विभागाकडून ४८८२.५६ कोटी, आणि आदिवासी विकास विभागाकडून ५४९.२९ कोटी रुपये योजनेसाठी नवा निधी म्हणून राखीव ठेवण्यात आले आहेत.

सामाजिक न्याय विभाग हा राज्यातील दुर्बल घटकांसाठी अनेक योजना राबवतो. पण आता त्याच विभागाच्या निधीचा वापर इतर योजनांसाठी होत असल्याने नाराजीचे वातावरण असल्याचे समजते.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सध्या काही महत्त्वाच्या योजनांसाठी निधी अपुरा आहे. त्यामुळे भविष्यात लाभार्थ्यांच्या हप्त्यांमध्ये विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे एका वरिष्ठ अधिका?याने सांगितले. या आधी देखील याच विभागाचा निधी वळवण्यात आल्याने महायुतीमध्ये तणाव निर्माण झाला होता.

## आमदारांच्या विमानवारीसाठी १४३ कोटींचा भार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
महायुती सरकारने हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी तब्बल ७५,२८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांचा प्रस्ताव विधानमंडळात मांडला. यात राज्यातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवास आणि त्यांच्या अनुषंगिक खर्चासाठी १४३ कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची तरतूद केली. हे १४३ कोटी जनतेकडून वसूल होणाऱ्या करातून खर्च होणार आहेत.

दरम्यान, इंडिगो संकटामुळे सर्व आमदारांच्या हवाई प्रवासाची व्यवस्था सरकारने करावी, अशी मागणी विधान परिषदेत काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी केली. त्यावर उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री अजित पवार यांनी हवाई प्रवास मुंबईपुरता न ठेवता पुण्याला जाणाऱ्या आमदारांसाठीही ठेवा, असे सांगितले. त्यामुळे १४३ कोटींमधून आमदारांच्या विमानवारीचा खर्च होण्याची दाट शक्यता आहे.

दुसरीकडे अधिवेशन संपताच चंद्रपूर, नागपूर वगळता सर्व मनपा निवडणुकांचा बिगुल वाजणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. हजारो कोटी रुपये खर्चून बांधलेला समृद्धी महामार्ग, वंदे मातरमसह इतर सुपरफास्ट रेल्वे उपलब्ध असताना आमदारांसाठी हवाई सेवेचा हट्ट कशासाठी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

महसूल व वन विभागाला सर्वाधिक १५,७२१.०८ कोटींचा निधी पुरवणी मागण्यांत नमूद आहे. नगर विकास (९,१९५.७६ कोटी), उद्योग, ऊर्जा (९,२०५,९० कोटी), कौशल्य विकास (६०९.७० कोटी), कृषी (६१६.२१ कोटी) सारख्या रोजगार व ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडलेल्या विभागांना तुलनेने कमी निधी आहे.

## भाजपला देशात निवडणूक सुधारणा नको

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि.९ :
मंगळवारी लोकसभेत निवडणूक सुधारणा वर बोलताना राहुल गांधी म्हणाले की, आरएसएस आणि भाजप देशातील संस्थांवर कब्जा करत आहेत. यामध्ये निवडणूक आयोग, अंमलबजावणी संचालनालय, सीबीआय गुप्तचर विभाग आणि आयकर विभाग यांचा समावेश आहे. हे स्पष्ट आहे की, भाजप निवडणूक आयोगाला निर्देश देऊन लोकशाहीला हानी पोहोचवत आहे.



राहुल गांधी यांनी तीन मागण्या केल्या. ते म्हणाले, निवडणुकीच्या एक महिना आधी सर्व राजकीय पक्षांना मशीन-रीडेबल मतदार याद्या उपलब्ध करून द्याव्यात.
सीसीटीव्ही फुटेज नष्ट करण्याचे नियमन करणारा कायदा बदलला पाहिजे. आपल्याला ईव्हीएम पाहण्याची परवानगी दिली पाहिजे. मतांची चोरी ही देशविरोधी आहे. सरकारला निवडणूक सुधारणा नको आहेत.
निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीतून सीजेआयला का काढून टाकण्यात आले? निवडणूक आयुक्तांना शिक्षा होऊ शकत नाही अशी तरतूद का ली गेली? आणि निवडणुकीनंतर ४५ दिवसांनी सीसीटीव्ही फुटेज का हटवावे? असे ३ प्रश्न त्यांनी विचारले.

## बाबा आढाव अनंतात विलीन

### शासकीय इतमामात अंत्यसंस्कार : अजित पवारांची उपस्थिती



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :
ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा आढाव यांच्या पार्थिवावर आज मंगळवारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह शैला आढाव, असीम आढाव, अंबर आढाव, माजी आमदार उल्हास पवार, माजी गृह राज्यमंत्री रमेश बागवे, ज्येष्ठ साहित्यिक सदानंद मोरे, अंकुश काकडे, सुषमा अंधारे, डॉ. अभिजीत वैद्य, बी.जी. कोळसे पाटील, नितीन पवार उपस्थित होते.

समता-न्या-बंधुतेचा जागर करणारे, घरोघरी संविधान पोहोचवण्याचा संकल्प केलेले, कष्टकऱ्यांचे नेते बाबा आढाव (वय ९५) यांचे सोमवारी रात्री निधन झाले. मागील काही दिवसांपासून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते.

डॉ. अभिजीत वैद्य यांनी यावेळी बोलताना सांगितले की, एखाद्या वृक्षाच्या फांद्यांवर अनेक पारंब्या आधार घेत आम्ही आतापर्यंत काम करत आलो आहोत. आमचा वटवृक्ष आज उन्मळून पडला आहे.

बाबांचे पुत्र असीम आढाव म्हणाले, त्यांच्या कामाचा व्याप मोठा होता; ते खरे लोकांचे महात्मा होते. शेवटपर्यंत त्यांनी असंघटित कामगार आणि वंचित घटकांसाठी आपले कार्य वाहिले. फुले यांच्या विचाराने आयुष्यभर बाबा जगले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बाबा आढाव यांना श्रद्धांजली वाहताना म्हटले की, वंचित आणि उपेक्षित लोकांसाठी बाबांनी आपले आयुष्य समर्पित केले. हमाल पंचायत, रिक्षा पंचायत, कामगार संघटना या माध्यमातून त्यांनी सातत्याने काम केले. फुले-शाहू-आंबेडकर यांची विचारधारा त्यांनी नेहमी अंमलात आणली. संघर्ष योद्ध्याप्रमाणे त्यांनी आयुष्यभर काम केले.

## तुकाराम मुंढेंवरून सभागृहात जोरदार खडाजंगी : भाजप आमदाराची लक्षवेधी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
भारतीय प्रशासन सेवेतील नेहमीच चर्चेत असलेले सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्यावरून आज विधानसभेत जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली.

तुकाराम मुंढे यांच्या निलंबनाची मागणी केल्यामुळे आपल्याला जीवे मारण्याच्या धमक्या येत असल्याचा आरोप भाजप आमदार कृष्णा खोपडे यांनी केला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे आदेश दिले.

यासंबंधी कृष्णा खोपडे यांनी सभागृहात लक्षवेधी मांडली. यावेळी विजय वडेट्टीवार यांनी तुकाराम मुंढेंची बाजू घेतली.

### वडेट्टीवारांनी घेतली बाजू : मुख्यमंत्र्यांचे चौकशीचे आश्वासन



नागपूरमधील स्मार्ट सिटी प्रकल्पातील कथित अनियमिततेवरून आमदार कृष्णा खोपडे यांनी तुकाराम मुंढेंवर गंभीर आरोप केलेत. नागपूर महापालिकेत आल्यावर अवघ्या ७ महिन्यांत मुंढे यांनी अधिकार नसताना स्मार्ट सिटी प्रकल्पात हस्तक्षेप केला आणि कोट्यवधींची कंत्राटे मंजूर केल्याचे खोपडे म्हणाले.

भाजप आमदार प्रवीण दटके यांनीही मुंढे यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

दुसरीकडे, काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी मात्र तुकाराम मुंढे यांची बाजू सावरली. कोणत्याही आमदाराला धमकी देणे चुकीचे आहे. हे सहन करता कामा नये. तुकाराम मुंढे यांची नियुक्ती नागपूर महापालिकेत झाली असताना त्यांच्या विरोधात चौकशी झाली होती. महिला आयोगाने मुंडे यांना क्लिन चिट दिली. ज्या महिलांनी तक्रार केली होती, त्यांनाच राष्ट्रीय महिला आयोगाने दंड ठोठावल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले.

या गदारोळानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला आश्वस्त केले. तुकाराम मुंढे प्रकरणात कृष्णा खोपडे यांना आलेल्या धमकी प्रकरणाचा गांभीर्याने तपास करणार आहोत. धमकी देणारे कोण आहेत? त्यांच्या मागे कोण आहेत? कोणाच्या इशाऱ्यावरून धमकी दिली? या सगळ्याचा तपास होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तर, मुंढे यांच्यावरील आरोपांबाबत सगळी माहिती घेतली जाणार असल्याचेही त्यांनी सभागृहात सांगितले.



# विधीमंडळ अधिवेशन

## बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना की भ्रष्टाचाराचे कुरण?



■ **नागपूर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची महत्त्वाकांक्षी योजना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' योजनेच्या अंमलबजावणीवर खुद्द सत्ताधारी पक्षातूनच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. चांगल्या हेतूने सुरू झालेली ही योजना स्थानिक पातळीवर भ्रष्टाचाराचे कुरण झाली आहे का? असा तिखट सवाल भाजपचे आमदार निरंजन डावखरे यांनी विधानपरिषदेत विचारला. ठाण्यातील एका केंद्रावर चक्क साडीचे दुकान सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याचे डावखरे यांनी सभागृहात सांगितले.

विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत होते. यावेळी निरंजन डावखरे यांनी 'आपला दवाखाना' योजनेतील अनागोंदीवर बोट ठेवले. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - आपला दवाखाना व ४००+ (किंवा केंद्रिय निधीद्वारे २२३२) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांपैकी किती केंद्रे प्रत्यक्षात चालू आहेत? काही केंद्रे बंद असल्याच्या तक्रारींवर काय उपाययोजना केली आहे? ठाणे महानगरपालिकेमार्फत चालवल्या जाणाऱ्या आपला दवाखाना उपक्रमातील दवाखाना बंद आढळला का आणि तिथे साडीचं दुकान होतं का? असा सवाल उपस्थित केला. याव्यतिरिक्त त्यांनी याच विषयांवर विविध प्रश्न उपस्थित केले.

**दोषींवर कारवाई करणार - मंत्री आबिटकर**

यावर उत्तर देताना मंत्री प्रकाश आबिटकर यांनी तातडीने कारवाईचे आश्वासन दिले. ₹मी माहिती घेतो. ठाणे मनपामध्ये ज्या त्रुटी असतील तर त्यामध्ये तात्काळ कारवाई करु, कोणालाही सूट देणार नाही. या योजनेमध्ये जो स्टाफ आहे, त्याबाबत आणखी सूचनांचं स्वागत करुन अंमलबजावणी करु. कारण मोहल्ला क्लिनिकसारख्या या योजनांमुळे गोरगरिबांना लाभ मिळतात, असे मंत्री आबिटकर सभागृहात म्हणाले

## आमदार अमोल खताळांचे आंदोलन

■ **नागपूर :** शिवसेना आमदार अमोल खताळ यांनी पुणे - नाशिक रेल्वे संगमनेर मार्गेच व्हावी या संगमनेरवासियांची न्याय्य मागणीसाठी आज नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानभवन परिसरात लक्षवेधी आंदोलन केले. पुणे - नाशिक रेल्वे संगमनेर मार्गे गेलीच पाहिजे, अशा आशयाचा टी-शर्ट परिधान करून आणि फलक हाती घेत संगमनेरकरांच्या मनातील भावना या लक्षवेधी आंदोलनाच्या माध्यमातून शासनापर्यंत पोहोचविल्या.




## अहवाल प्राप्त होऊनही अधिकाऱ्याचे निलंबन का नाही?

■ **नागपूर :** काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी मंगळवारी विधानपरिषदेत तक्रारीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरही अधिकाऱ्यांवर कारवाई होत नसल्याची खंत व्यक्त केली. ते म्हणाले, तक्रारीचा अहवाल प्राप्त झाला असेल तर सरकार त्या अधिकाऱ्याचे निलंबन का करत नाही? राज्यातील जलसंधारणाच्या कामांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत शिवसेनेचे गटनेते अनिल परब प्रश्न उपस्थित केला.

महाराष्ट्र राज्य जलसंधारण महामंडळाच्या एका अधिकाऱ्यांसदर्भात सरकारकडे तक्रारी आणि त्याचा अहवाल प्राप्त झाला असताना त्या अधिकाऱ्यावर कारवाई का केली जात नाही. ज्या कंपनीला लोकायुक्तांनी अपात्र केलं, हायकोर्टामध्ये त्याची चौकशी सुरू आहे त्या कंपनीला बिनदिक्कत पात्र करणाऱ्या अधिकाऱ्याचे निलंबन का केलं जात नाही? बदली करण्यात आली आहे, हे सरकारनेही मान्य केलेले असताना त्याचे निलंबन का केले जात नाही? असा परखड सवाल त्यांनी या प्रकरणी सरकारला केला. त्यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाची चौकशी करून दोन महिन्यात कारवाई करू असे आश्वासन दिले.

### फलटण महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरण

# ६० दिवसांत आरोपपत्र दाखल होणार





■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :** फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरच्या आत्महत्येवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत निवेदन केले. प्रस्तुत प्रकरणात ६० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करण्यात येणार आहे.

आतापर्यंत झालेल्या न्यायवैद्यक तपासात महिला डॉक्टरच्या हातावर आढळलेली नोट तिनेच लिहिल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच हे गळफास लावून आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

भाजप आमदार अमित साटम यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर मुख्यमंत्री म्हणाले, महिला डॉक्टरच्या आत्महत्येचे प्रकरण अत्यंत दुर्दैवी आहे. एक महिला डॉक्टर यांनी आत्महत्या केली. त्यातून समाजात खूप मोठ्या प्रमाणात संतापाची लाट निर्माण झाली. सरकारने यासंदर्भात एसआयटी व ज्यूडिशिअल इन्क्वायरीही नेमली. आतापर्यंतच्या तपासासंदर्भात सदस्याने ३ मुद्दे उपस्थित केले.

त्यात न्यायवैद्यक पथकाच्या रिपोर्टमध्ये त्या महिला डॉक्टरच्या हातावर आढळलेली नोट तिनेच लिहिल्याचे स्पष्ट झाले आहे. दुसरा विषय त्यांनी आरोपींनी दबाव आणला का? असा मांडला. तर मुळात या सगळ्या केसमध्ये पोलिस अधिकारी गोपाळ बदने यांनी डॉक्टरची फसवणूक करून त्यांचे लैंगिक शोषण केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यातून मग लग्नाचे आमिष दाखवणे आदी सगळ्या गोष्टी लक्षात येतात. त्यानंतर या बदनेंनी वेगळी भूमिका घेतली.

मुख्यमंत्री म्हणाले, मृत महिला ही मेडिकल ऑफिसर होती. एखाद्या आरोपीला अटक होते तेव्हा तो अटकेसाठी फिट आहे की नाही यासंबंधीचा रिपोर्ट घ्यावा लागतो. अशा प्रकारचे काही रिपोर्ट त्या डॉक्टर महिलेने अनफिट दिले. त्यामुळे पोलिसांनी एक मोठे पत्र त्यांच्या वरिष्ठांना दिले होते.

हे सर्व आरोपी अत्यंत महत्त्वाच्या गुन्ह्यांतील गुन्हेगार आहेत आणि त्यांना अनफिटचे प्रमाणपत्र दिले जात आहे, अशी बाब त्यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिली. नंतर त्यांची चौकशी झाली. त्यांनीही आपली बाजू मांडली. पण हा घटनाक्रम ५ महिने अगोदरचा आहे.

आत्ता जी काही सुसाईड आपल्याला दिसत आहे, त्यात एकीकडे बदनेंनी केलेली फसवणूक आहे आणि दुसरीकडे त्या सगळ्या परिस्थितीचा फायदा घेऊन जो दुसरा आरोपी आहे, त्या आरोपीनेही एकप्रकारे तिची फसवणूक केली आहे.

त्यामुळे त्या दोघांचे नाव लिहून त्या ठिकाणी या महिलेने आत्महत्या केली. यात आत्तापर्यंतचे जे काही रिपोर्ट आहेत, त्यात दोन गोष्टी क्लिअर झाल्या आहेत. एक, ही गळफास लावून केलेली आत्महत्या आहे आणि दोन, हातावर जे काही लिहिलेले आहे ती अक्षरे त्या महिलेचीच आहेत.

हा तपास अजून संपला नाही. याचे आरोपपत्र लवकरच दाखल होईल. पण समांतरपणे अनेक गोष्टी या प्रकरणी सांगण्यात आल्या. त्यामुळे त्याचीही स्वतंत्रपणे चौकशी करण्यासाठी आपण न्यायाधीशांची समिती नियुक्त केली आहे. ते ही या प्रकरणाची चौकशी करत आहेत. या प्रकरणी पोलिसांचा तपास महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सुरू आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी डिजिटल, तांत्रिक व न्यायवैद्यक पुरावे काही संकलित करण्यात आलेत का? व दोन आरोपींशिवाय इतर आरोपी आढळलेत का? असा प्रश्न केला. आरोपीला फिट अनफिट दाखवण्यासाठी सातत्याने सदर महिला डॉक्टरचीच ड्यूटी लावण्यात येत होती. तिच्यावर दबाव टाकला जात होता. या प्रकरणीही चौकशी झाली पाहिजे, असे ते म्हणाले.

त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, या प्रकरणी सर्व न्यायवैद्यक पुरावे आहेत. व्हॉट्सॲप चॅट प्राप्त झाले आहेत. सदरहू महिला डॉक्टर हॉटेलमध्ये आल्या आणि आपल्या रूममध्ये गेले. त्याचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांकडे आहे. त्यामुळे तिथे कोण आले कोण गेले त्याची सर्व माहिती उपलब्ध आहे. या प्रकरणी नव्या कायद्यानुसार फॉरेन्सिक पुरावे गोळा करण्यात आलेत. त्याचे विश्लेषण केले जात आहे.

अशा गुन्ह्यात आपण ६० दिवसांत आरोपपत्र दाखल करतो. ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. या व्यक्तिरिक्त या प्रकरणात वरील २ आरोपींशिवाय इतर कुणाचा हात आहे का? हे तपासण्यासाठीच आपण न्यायिक चौकशी समिती नेमली आहे, असे ते म्हणाले.

दरम्यान, सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळंके यांनी यावेळी मृत महिलेच्या कुटुंबीयातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्याची मागणी केली. त्यावर मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी पीडित कुटुंबीयांना योग्य ती मदत करण्याचे आश्वासन सभागृहासमोर दिले.

### शिवाजी महाराजांचा पुतळा

# सीएसएमटीवर होणारच



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ९ :** मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या (सीएसएमटी) प्रवेशद्वारावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यावरून निर्माण झालेला संभ्रम अखेर दूर झाला आहे.

केंद्राने दिलेल्या नकारात्मक उत्तरामुळे हा प्रश्न ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे विधानसभेत लावून धरला होता. यावर उत्तर देताना, केंद्राने दिलेले उत्तर हे जुन्या आराखड्यानुसार असून, स्थानकाच्या पुनर्विकासाच्या नव्या आराखड्यात शिवरायांच्या पुतळ्याचा समावेश आहे, असे स्पष्टीकरण देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिले.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या आवारात दर्शनी भागात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यासंदर्भात मागील अधिवेशनात शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी मुख्यमंत्री यांनी दिलेले उत्तर आणि काही दिवसांपूर्वी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री यांनी हा पुतळा उभारता येणार नाही असे लेखी उत्तर संसदेतील ठाकरे गटातील गटनेते खासदार अरविंद सावंत यांना दिल्याने संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर भास्कर जाधव आज विधानसभेत स्थगन प्रस्ताव मांडून शासनाला वस्तुस्थितीची विचारणा केली.

सीएसटी स्टेशनचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस नाव झाले आणि त्याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभा करावा, असा प्रस्ताव सभागृहात मांडला. तो विषय बीएससीमध्ये ऐकून घेतला. त्यानंतर सभागृहात मुख्यमंत्री हजर असताना, तो विषय सभागृहात उपस्थित केला.

आज स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून एक गोष्ट लक्षात आणून द्यायची की, त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक उत्तर दिले. जुने व्हिटी स्टेशनचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस नामकरण झाले. त्या ठिकाणी भव्य पुर्नविकास सुरू आहे.

त्या माध्यमातून आयकॉनिक स्टेशन तयार करण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या आराखड्याचा एक भाग म्हणून सदर ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार आहे. त्यामुळे सभागृहात आता वेगळा ठराव करण्याची गरज नाही, असे मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी सांगितल्याचे भास्कर जाधव म्हणाले.

परंतु, अरविंद सावंत यांना लोकसभेत रेल्वे राज्य मंत्री यांनी लिखित स्वरूपातचे पत्र दिले. या ठिकाणी शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचे काम हे आमच्या अखत्यारित नाही, तर रेल्वेच्या अखत्यारित येते. म्हणून तो विचार शासनाच्या विचाराधीन नाही, असे उत्तर दिल्याचे भास्कर जाधव यांनी विधानसभेत सांगितले.

### रोहित आर्या दहशतवादी नसताना

# त्याचे एन्काऊंटर का केले?



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :** पवई इथे रोहित आर्या नामक व्यक्तीने काही मुलांना ओलिस ठेवून सरकारकडे थकीत असलेले पैसे मागितले होते. पण त्यानंतरही त्याचे एन्काउंटरच्या माध्यमातून खून का करण्यात आला? असा सवाल काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत उपस्थित केला.

रोहित आर्या नामक व्यक्तीने गत ३० ऑक्टोबर रोजी पवई स्थित आर के स्टुडिओत १७६ मुलांसह दोघांना ओलीस ठेवले होते. त्याने सरकारकडे काही कोटी रक्कम थकीत असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर पोलिसांनी त्याचे एन्काउंटर केले होते. विधानसभेत आज लक्षवेधीच्या माध्यमातून रोहित आर्या प्रकरण बाबत काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी प्रश्न मांडले.

रोहित आर्यांने महायुती सरकार असताना स्वच्छता मॉनिटर आणि मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या प्रोजेक्टवर काम केले होते. त्याचे पैसे सरकारने थकवले होते. त्याने व्हिडिओ काढून सांगितले माझे पैसे द्यावे ,मी दहशतवादी नाही. असे असताना रोहित आर्यांचे एन्काऊंटर का करण्यात आले? पायावर गोळी का मारली नाही? नेमकी त्याचवेळी एन्काऊंटर स्पेशलिस्ट पोलिस कसा काय तिथे उपलब्ध होता? असे प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केले.

या प्रकरणी रोहित आर्या याने वारंवार आंदोलन केले, उपोषण करून पैसे मागितले होतें पण तत्कालीन मंत्र्यांनी पैसे थकवल्याने ही घटना घडली.या प्रकरणी माजी मंत्र्यांची चौकशी केली का? सरकारकडे पैसे प्रलंबित आहे का? असा प्रश्न वडेट्टीवर यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला.

यावेळी उत्तर देताना मंत्र्यांनी या प्रकरणी चौकशी सुरू आहे. रोहित आर्यांने लहान मुलांना ओलिस धरले म्हणून पोलिसांनी स्वरक्षणासाठी कारवाई केल्याचे स्पष्ट केले.

मानवी हक्क आयोगाने समिती नेमून चौकशी करायला सांगितले त्यानुसार चौकशी सुरू आहे. यातील संबंधितावर कारवाई होईल अस आश्वासन मंत्र्यांनी दिले.

# विधानसभेत गाजला भटक्या कुत्र्यांचा मुद्दा

### सर्वपक्षीय आमदारांकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी : सरकार घेणार बैठक



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ९ :** विधानसभेत मंगळवारी भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवावर गंभीर चर्चा झाली. राज्यातील बिबट्यांच्या समस्येवरही लक्षवेधी मांडण्यात आली होती, परंतु भटक्या कुत्र्यांचा विषय अधिक गाजला. त्रस्त आमदारांनी यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

चर्चेदरम्यान अनेक सदस्यांनी बिबट्यांपेक्षा भटक्या कुत्र्यांची समस्या अधिक गंभीर असल्याचे मत व्यक्त केले. बिबट्या जंगलात राहतो, पण भटकी कुत्री गल्लीबोळात आढळतात, असे सदस्यांनी निदर्शनास आणले.

अतुल भातखळकर, महेश लांडगे, सुनील प्रभू, विजय वडेट्टीवार आणि नाना पटोले या आमदारांनी लक्षवेधीद्वारे भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिलेल्या उत्तराने सदस्यांचे समाधान झाले नाही. अखेर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हस्तक्षेप करत या समस्येवर मंत्रालयात बैठक घेऊन उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

सदस्यांनी सांगितले की, भटक्या कुत्र्यांमुळे नागरिक, विशेषतः लहान मुले आणि विद्यार्थी भयभीत झाले आहेत. कुत्रे चावण्याच्या घटना आणि हल्ले वाढले असून, रेबीजचा धोकाही वाढला आहे. अनेक ठिकाणी कचरा व्यवस्थापन आणि निबीर्जीकरण मोहिमांच्या अभावामुळे ही समस्या अधिक गंभीर झाली आहे.

महेश लांडगे यांनी भटक्या कुत्र्यांना पकडून प्राणीप्रेमींच्या घरात सोडावे, अशी सूचना केली. प्राणीप्रेमींना या समस्येची जाणीव होईल, असे ते म्हणाले. सुनील प्रभू यांनी, आम्ही एखाद्या वस्तीत गेल्यास भटकी कुत्री मागे लागतात; जर आम्हाला चावले तर काय करणार? असा प्रश्न विचारला. आमदारांनी भटक्या कुत्र्यांचा उपद्रव भयंकर असल्याचे सांगत, त्यांच्या निर्बीजीकरणाची आणि त्यांना शेल्टर होममध्ये ठेवण्याची मागणी केली. मात्र, राज्यमंत्री यावर उत्तर देऊ शकल्या नाहीत.

### आरक्षण, पदोन्नती, शासकीय सवलतींसाठी यूडीआयडी कार्ड अनिवार्य - सावे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :** राज्यातील सर्व शासकीय कार्यालये व विभागांमध्ये युनिक डिसॅबिलिटी आयडी (यूडीआयडी) कार्ड सादर करणे ९ ऑक्टोबर २०२५ पासून सक्तीचे करण्यात आले असून, याबाबतचा शासन निर्णय सर्व विभागांना कळविण्यात आला आहे. आरक्षण, पदोन्नती, विविध शासकीय सवलती यासाठी यूडीआयडी कार्ड अनिवार्य असून, जानेवारी २०२६ अखेरपर्यंत सर्व शासकीय कार्यालयांना कागदपत्रांची पडताळणी सादर करणे आवश्यक असल्याची माहिती इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली.

बोगस दिव्यांग प्रमाणपत्र देणा?या व्यक्तींवर दिव्यांग अधिनियम २०१६ च्या कलम ९१ नुसार दोन वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे. शासकीय रुग्णालयांनी दिव्यांग प्रमाणपत्र तपासणीसाठी आठवड्यात किमान दोन दिवस उपलब्ध करून द्यावेत, अशा सूचनाही शासनाने दिल्या असल्याचे मंत्री सावे यांनी सांगितले.

# तेवढ्या पैशात तर शेतकरी कर्जमाफी झाली असती

### राज्यात लोकशाही राहिली नाही : शशिकांत शिंदेंचा हल्लाबोल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :** नगरपालिका निवडणुकीत सत्ताधारी पक्षाकडून प्रचंड पैसा वाटण्यात आला. इतका पैसा आहे तो शेतकऱ्यांना दिला असता तर शेतकरी कर्जमाफी झाली असती. कर्जमाफी न करता सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना आर्थिक सक्षम करण्याचा प्रयत्न सुरू आहे, त्यासाठी प्रचंड प्रमाणात कर्ज काढण्याचा प्रयत्न सुरू आहे त्यांचा आम्ही निषेध करतो, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी म्हटले आहे.



शशिकांत शिंदे म्हणाले की, आम्ही कितीही खुलासे केले तरी सरकार एवढे निर्भीड झाले आहे की ते कोणतीही चौकशी करणार नाही, कारवाई करणार नाही. वॉशिंगमशीनमध्ये सगळं संगळं साफ केले जाणार आहे. राज्याची कायदा-सुव्यवस्था, आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यावर सरकारला घेरणार आहोत. आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सुरू आहे. विरोधी पक्षनेत्यासाठी १० टक्क्याचा निकष ही काढलेली पळवाट आहे. विरोधी पक्षनेता असला पाहिजे, तो देत नाही याचा अर्थ लोकशाही राहिलेली नाही.

शशिकांत शिंदे म्हणाले की, हिवाळी अधिवेशनात आम्ही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आम्ही आवाज उठवत आहोत. दुर्दैव असे आहे की आजही ७५ हजार कोटी रुपयांचे पुरवणी मागण्या आल्या आहेत. किती लोकांनी सरकारविरोधात आंदोलन केले यापेक्षा कोणत्या भावनेने आंदोलन केले हे महत्त्वाचे आहे. म्हणून आम्ही आज सरकारविरोधात आंदोलन केले आहे.

**शहाजीबापूवर धाड हे दबावतंत्र**

शशिकांत शिंदे म्हणाले की, अंबादास दानवे यांनी जे कॅश बॉम्ब काढला आहे तसे अनेक बॉम्ब आम्ही पण काढले आहेत, महायुतीमधील सत्ताधारी मित्रपक्षाने देखील काढले आहेत पण काहीही झालेले नाही. जिथे विरोधी पक्षाची लोकं आहेत त्यांच्यावर चौकशी आणि धाडी टाकण्यात आल्या.

आमच्यावर धाडी टाकल्या तिथे पर्यंत कबूल होते पण आता मित्र पक्षाच्या नेत्यांवरदेखील धाडी टाकण्यात आल्या. शहाजीबापू असोत की अन्य नेत्यावर धाडी टाकण्यात आल्या. महायुतीमध्ये हा क्रॉस गेम सुरू आहे. नीलेश राणे यांनी त्यांच्या मतदारसंघात पैसे पकडून दिल्यावर शहाजीबापूवर धाड पडते हे सहज होत नाही, हे दबावतंत्र आहे.

शशिकांत शिंदे म्हणाले की, ते केवळ सत्तेसाठी सोबत आहेत. नीलेश राणे आणि रवींद्र चव्हाण भेटीनंतर आमच्यात वाद नव्हता या वक्तव्यावर त्यांनी महायुतीच्या नेत्यांवर टीका केली. नगरपालिका निवडणूक झाली त्यामध्ये लोकशाही कुठे होती? निवडणूक आयोगाच्या समोर तिथे पैसे वाटले जातात, महाराष्ट्रात असे वातावरण कधीच नव्हते, त्यामुळे बॅलेट पेपरवर निवडणूक घेतली पाहिजे.

# स्वप्न मोठं ठेवा, पण पाया संविधानाचा ठेवा..

### संसदीय अभ्यास वर्गातून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी साधला तरुणांशी संवाद





■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :** भविष्यात तुम्ही कोणत्याही क्षेत्रात पुढे गेलात नेता, अधिकारी, उद्योगपती किंवा पत्रकार झालात, तरी संविधानिक मूल्यांचे भान ठेवून काम केलात तर देशाचा विकास निश्चित आहे, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्यावतीने आयोजित ५१ व्या संसदीय अभ्यास वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

आपल्या भाषणात शिंदे यांनी भारतीय लोकशाहीची ताकद, लोकप्रतिनिधींच्या जबाबदाऱ्या आणि विद्यार्थी तरुणाई समोर असलेल्या संधींचे अत्यंत प्रभावी वर्णन केले. ते म्हणाले की, भारतीय लोकशाही म्हणजे फक्त प्रतिनिधिक नाही तर सहभागी लोकशाही आहे. देशातील १४० कोटी नागरिक विविध धर्म, भाषा, जाती असूनही शांततेने एकत्र राहतात हे लोकशाहीचे अद्वितीय सामर्थ्य आहे. लोकशाही आपल्याला अधिकार देते पण त्या अधिकारांसोबत कर्तव्यांची जाणीव करून देते, असेही त्यांनी नमूद केले.

विधिमंडळातील प्रत्येक निर्णय लाखो लोकांच्या जीवनाला दिशा देतो, त्यामुळे विद्यार्थ्यांनी संसदीय प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला पाहिजे. पुस्तकातील मजकूर आणि प्रत्यक्ष परिस्थिती यात जमीन-आसमानाचा फरक आहे, तो या अभ्यासवर्गातून स्पष्ट जाणवेल, असे शिंदे म्हणाले.

ते पुढे म्हणाले की आजचे विद्यार्थी म्हणजे उद्याचे नेते, अधिकारी, उद्योगपती किंवा पत्रकार आहेत आणि संविधानाचे भान ठेवून काम केले तर देश निश्चितच प्रगती करेल. आपल्या आयुष्यातील संघर्षमय प्रवासाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की ते थेट लोकांमध्ये उतरून अनुभवातून शिकत शिकत या स्थानापर्यंत पोहोचले. पदे ही लोकांनी दिलेली जबाबदारी आहेत; त्यांचा वापर सामान्यांच्या जीवनात बदल घडवण्यासाठीच केला पाहिजे, असे ते म्हणाले.

**समान न्याय मिळणे हे लोकशाहीचे तत्व**

विधानसभाध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपसभापती नीलम गोऱ्हे आणि इतर मान्यवरांचे कौतुक करत त्यांनी सांगितले की, सभागृह शिस्तीत चालणे आणि सत्ता विरोधक दोघांना समान न्याय मिळणे हे लोकशाहीचे महत्वाचे तत्व आहे.

शेवटी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना ते म्हणाले की अभ्यासवर्ग तुम्हाला सजग नागरिक बनवेल आणि भविष्यातील नेतृत्वाला नवी दिशा देईल. हा सोहळा विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणारा ठरला.


# इच्छूक उमेदवारांची झोप उडाली?

## महायुती एकत्र लढणार असल्याच्या चर्चेने राजकीय गणित बदलण्याची भीती

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.९)** – आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) हे तिन्ही पक्ष महायुतीच्या नावाने एकत्र लढण्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. राज्यपातळीवरून मिळत असलेल्या संकेतांमुळे इच्छूक उमेदवारांची झोप उडाली असून अनेकांच्या पायाखालची जमिन सरकली आहे.

अलीकडच्या काही महिन्यांत तिकीट मिळावे या अपेक्षेने अनेक कार्यकर्त्यांनी आपला पक्ष सोडून मित्रपक्षात प्रवेश केला होता. काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी स्वबळावर लढण्यासाठी तयारी सुरू केली होती. मात्र आता महायुतीने एकत्रितपणे रणनिती आखल्यास आपले राजकीय 'पत्ते' कटतील का, अशी धाकधूक इच्छूकांमध्ये निर्माण झाली आहे. राज्य नेतृत्वाच्या स्तरावर महायुतीतील तिन्ही पक्षांची लवकरच बैठक होणार असल्याची माहिती समोर येत आहे. या बैठकीत स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये जागावाटप आणि संयुक्त प्रचाराबाबत निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. परिणामी, तिकीटाच्या आशेने पक्षांतर केलेल्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाची स्थिती आहे.



### अंतिम निर्णय अस्पष्ट

दुसरीकडे, स्थानिक नेत्यांनी मात्र अद्याप अधिकृत निर्णय झालेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. युतीबाबत अंतिम निर्णय येईपर्यंत कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकदीनिशी कामाला लागावे, असे आवाहन स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

### राजकीय भवितव्यावर परिणामी


महायुती एकत्र लढणार की, स्वबळावर याबाबतचा अंतिम निर्णय प्रलंबित असला तरी या चर्चेमुळे जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. आगामी काही दिवसांत युतीचा निर्णय स्पष्ट झाल्यानंतर अनेकांचे राजकीय भवितव्य बदलण्याची दाट शक्यता आहे.

# त्या जंगली श्वापदाने केली काळविटाची शिकार ?

## शेतकरी-ग्रामस्थ म्हणतात बिबट; वनविभाग म्हणतो अस्तित्वाच्या खुणा नाहीत



परिसरात भीतीचे वातावरण



महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी (दि. ९)** – अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सातेगाव–मलकापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून जंगली श्वापद फिरत असल्याच्या चर्चा होत होत्या. काही शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष दिसल्याचा दावा केला होता. अखेर काल (दि. 7) चिंचोली शेतशिवारात मोठ्या काळविटाची झालेली शिकार पाहिल्यानंतर या श्वापदाचा वावर निश्चित झाला.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाने पाहणी केली; मात्र पगमार्क, विष्ठा किंवा इतर पुरावे न मिळाल्याने शिकार कोणत्या श्वापदाने केली याबाबत अद्याप स्पष्टता नाही. तरीही ग्रामीणांचा ठाम दावा आहे की, हे श्वापद बिबट्यासारखेच आहे. सातेगाव, मलकापूर, गावंडगाव, चिंचोली आणि वनोजा परिसरात हे श्वापद दिसल्याच्या वार्ता आधीपासूनच होत्या. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीवर काही कर्मचाऱ्यांकडून उर्मट प्रतिक्रिया मिळाल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला.

कापूस वेचणी आणि रब्बी हंगाम सुरू असताना या जंगली श्वापदाच्या धास्तीने शेतकरी आणि शेतमजूर भयभीत आहेत. घटनास्थळी पंचनामा करून पोलिस आणि ग्रामस्थांनी परिस्थितीचा आढावा घेतला. वनविभागाने दोन पथके तयार करून घटनास्थळी ट्रॅप कॅमेरे बसविले आहेत. श्वापदाच्या अस्तित्वाचे ठोस पुरावे नसले तरी चौकशी सुरू आहे, असे वनपरीक्षेत्र अधिकारी दिनेश वाळके यांनी सांगितले.

# डिजिटल अरेस्ट करून महिलेची 9.40 लाखांने फसवणूक

## दिल्ली क्राईम ब्रांचच्या नावावरून धमकी ◆ सायबर सेलमध्ये गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 9)** – शहरातील एका महिलेला डिजिटल अरेस्टची भीती दाखवून अज्ञात साइबर ठगांनी तब्बल 9 लाख 40 हजारांची ऑनलाइन फसवणूक केल्याची धक्कादायक घटना सोमवारी समोर आली आहे. दिल्ली क्राईम ब्रांचकडून बोलत असल्याचे भासवत आरोपीने महिलेच्या नावावर दिल्लीतील बँक ऑफ बडोदा शाखेत खाते उघडून कोट्यवधींची उलाढाल झाल्याची खोटी माहिती दिली आणि गुन्हा दाखल असल्याचे सांगत डिजिटल अरेस्टची धमकी दिली. या प्रकरणी सायबर सेल पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

तक्रारदार महिलेला 20 नोव्हेंबर 2025 रोजी अज्ञात क्रमांकावरून फोन आला. दिल्ली क्राईम ब्रांच मधून बोलत असल्याचे सांगत आरोपीने तिच्या नावाने दिल्लीतील बँक ऑफ बडोदा शाखेत खाते उघडण्यात आल्याचा आणि त्या खात्यातून कोट्यवधी रुपयांचे व्यवहार झाल्याचा दावा केला. या प्रकरणाची तक्रार दिल्ली क्राईम ब्रांचकडे दाखल असल्याचे सांगून आरोपीने महिलेकडून आधारकार्ड व बँक खात्याची माहिती घेतली. यानंतर तुमच्यावर गुन्हा दाखल आहे, आता तुम्हाला डिजिटल अरेस्ट करण्यात येणार आहे अशी भीती दाखवून तात्काळ 10 लाख जमा करण्याची धमकी दिली.

### कर्ज काढून दिले पैसे

अचानक आलेल्या धमकीमुळे घाबरलेल्या महिलेने अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून 9 लाख 40 हजारांचे कर्ज काढले आणि आरोपीने सांगितलेल्या बँक खात्यावर आरटीजीएसद्वारे पैसे पाठवले. यानंतर आरोपीने संपर्क तोडला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने सायबर सेलमध्ये तक्रार दाखल केली. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार आरोपीने तिला आरबीआयचे बनावट दस्तऐवज, बनावट केसेस दाखवून डिजिटल अरेस्टचे नाटक केले. त्यामुळे तिने भीतीपोटी रक्कम पाठवल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. सायबर सेल पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# दानपेटी चोरी प्रकरणातील मुख्य आरोपी जेरबंद; मुद्देमाल जप्त

## गाडगेनगर पोलिसांची मोठी कामगिरी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 9)** – गाडगेनगर पोलिस स्टेशनच्या डिबी पथकाने तीन गुन्ह्यांतील फरार आरोपीला पकडत दानपेटी चोरी प्रकरण उघडकीस आणले आहे. रामपुरी कॅम्प येथील राममंदिरातील दानपेटी चोरी उचलल्याप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यातील मुख्य आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून मुद्देमालही जप्त करण्यात आला.

फिर्यादी शुभम शामलाल बजाज (27, व्यवसाय ङ्क पुजारी, रा. कृष्णानगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, 25 ते 26 ऑक्टोबर 2025 च्या दरम्यान रामपुरी कॅम्प येथील राममंदिरात ठेवलेली दानपेटी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. दानपेटीत अंदाजे 14,500 ते 15,000 रुपये होते. यावरून गुन्हा नोंदविण्यात आला. तपासादरम्यान फरार आरोपीचा शोध घेत असताना डिबी पथकाला गुप्त बातमीदाराकडून खात्रीलायक माहिती मिळाली. त्यानुसार 9 डिसेंबर 2025 रोजी गाडगेनगर परिसरातील रामलक्ष्मण संकुलाच्या मागील खुल्या जागेत सापळा रचून आरोपी गजानन अरुण आत्राम (47, रा. अशोकनगर, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त शाम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ऑपरेशनमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर, पोलिस निरीक्षक विजया पंधरे यांच्या मार्गदर्शनात डिबी इंचार्ज पोलिस हवालदार भारत वानखडे, प्रकाश मीसाळ, आशिष ठाकरे, नितीन कामडी, मंगेशकुमार मुलनकर, सुशांत प्रधान, मतिन शेख यांनी केली.

# गाडगेनगरातील दुचाकी चोरीचा गुन्हा उघड; आरोपी जेरबंद

## चोरीची हिरो पॅशन प्रो जप्त ◆ गुन्हे शाखेची धडक कारवाई

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 9)**– गाडगेनगर पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या दुचाकी चोरीच्या गुन्ह्यात अमरावती शहर गुन्हे शाखेने एका चोराला अटक करून मोठी कामगिरी केली. नरेश अरुणराव आत्राम (वय 42, रा. अशोकनगर, अमरावती) असे आरोपीचे नाव असून, त्याच्या ताब्यातून चोरीची मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

7 नोव्हेंबर रोजी फिर्यादी करण केशव स्वर्गीय (रा. भानखेडा, ता. अमरावती) यांनी दिलेल्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला होता. तपासादरम्यान गुन्हे शाखेला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की नरेश अरुणराव आत्राम (वय 42, रा. अशोकनगर, अमरावती) याच्या ताब्यात एक चोरीची दुचाकी आहे. या माहितीवर कारवाई करत गुन्हे शाखेच्या पथकाने ईतवारा बाजार परिसरात आरोपीला थांबवून त्याच्याकडे असलेल्या वाहनाबाबत चौकशी केली. चौकशीत आरोपीने सांगितले की ही दुचाकी त्याला त्याचा मित्र दाऊ उर्फ दाविद प्रभुदास मनोहरे (रा. भीमनगर, अमरावती) याने वापरण्यास दिली होती. त्यानंतर आरोपी नरेश आत्राम आणि दुचाकी दोन्ही ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी गाडगेनगर पोलिसांकडे सोपविण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी 25 हजार रुपये किमतीची दुचाकी जप्त केली. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ, श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, सहायक पोलिस निरीक्षक मनिष वाकोडे, पोलिस हवालदार सतीश देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, पोलीस नाईक नाझीमोद्दीन सैय्यद, पोलीस रणजित गावंडे, चालक अंमलदार प्रभात पोकळे यांनी केली.

# त्या अट्टल चोरापासून आणखीन दोन मोटारसायकली जप्त

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, (दि. 9)** – मोर्शी पोलिसांनी अट्टल मोटारसायकल चोराकडून आणखी दोन चोरीच्या मोटारसायकलांसह एकूण 1,05,000 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. लवकेश उर्फ ललित गजेंद्र भोगे (25 रा. मोरचुद, ता. वरूड, जि. अमरावती; ह.मु. महाराष्ट्र कॉलनी, मोर्शी) तपास सुरू असताना आरोपी भोगे याने चौकशीदरम्यान त्याने आणखी दोन मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. या आधी या चोरट्याकडून 26 दूचाकी जप्त करण्यात आल्या होत्या.

हिरो कंपनीची पॅशन प्रो, काळा रंग, क्र. एमएच 27/बीडब्ल्यु 1901, (किंमत ङ्क 50 हजार रु.), हिरो कंपनीची पॅशन प्रो, लाल रंग, क्र. एमएच 27/ एजे 1129, किंमत (55 हजार रु.) दोन्ही मिळून एकूण 1,05,000 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक, अप्पर पोलिस अधीक्षक आणि उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि आकाश शिवणकर, अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर, अथर्व कोहळे, योगेश सांभारे, निलेश नेवारे व सागर धापर यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# कंटेनरमधून गोवंश वाहतूक करणारी टोळी पकडली

## अमरावती ग्रामीण एलसीबीची मोठी कारवाई ◆ 20.58 लाखांचा मुद्देमाल जप्त

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 9)** – गोवंश कत्तलीसाठी होणारी अवैधरित्या वाहतूक रोखण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी उचललेले पाऊल प्रभावी ठरत आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या गोवंश पथकाने समृद्धी महामार्गावर धडक कारवाई करून कंटेनरमधून क्रूरतेने नेली जात असलेली 33 जनावरे जप्त केली असून एकूण 20 लाख 58 हजार रुपये किंमतीचा माल ताब्यात घेण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी गोवंश वाहतूक करणाऱ्या टोळीवर कठोर कारवाई करण्याच्या सुचना दिल्यानंतर गोवंश पथकाने तपासाची चक्रे वेगात फिरवली. 8 नोव्हेंबर रोजी गोवंश पथकाचे पोलिस उपनिरीक्षक विशाल रोकडे हे पथकासह मंगरुळ दस्तगीर हद्दीत समृद्धी महामार्गावर गस्त घालत होते. त्यावेळी गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की पुलगावहून धामणगावकडे जाणाऱ्या एका कंटेनरमध्ये गोवंश जातीची जनावरे पाय व तोंड बांधून कत्तलीसाठी नेली जात आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे गोवंश पथक व मंगरुळ दस्तगीर पोलिसांनी आष्टा गावाजवळ समृद्धी महामार्गावर सापळा रचला. यादरम्यान एक कंटेनर रस्त्याच्या कडेला संशयास्पद स्थितीत उभा असल्याचे पथकाला दिसले. तपासणी केली असता वाहनात चालक किंवा कोणताही व्यक्ती आढळला नाही. कंटेनर उघडून पाहणी केल्यावर 33 गोवंश जनावरे अत्यंत क्रूरतेने कोंबून ठेवलेली आढळली. यांची किंमत = 5,58,000 रुपये आहे. तर कंटेनर वाहनाची किंमत = 15,00,000 रुपये आहे. अशा प्रकारे एकूण 20,58,000 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त कंटेनर व जनावरे पुढील कारवाईसाठी मंगरुळ दस्तगीर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल पवार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात मंगरुळ दस्तगीर ठाणेदार गौतम इंगळे, पोलिस उपनिरीक्षक विशाल रोकडे, पोलीस अंमलदार सहदेव राठोड, संतोष तेलंग, संदीप पाटील, दिपक पाटील, मारोती वैद्य, चालक किशोर सुने यांनी केली. अमरावती ग्रामीण पोलिसांच्या या कारवाईमुळे गोवंश वाहतूक करणाऱ्या टोळीला मोठा धक्का बसला असून परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

# निम्न पेढी प्रकल्पातील स्थलांतराला वेग द्या!

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.9)**– निम्न पेढी प्रकल्प प्राधान्यक्रमात आहे. त्यामुळे हा प्रकल्प गतीने पुर्ण करण्यात येणार आहे. यासाठी निम्न पेढी प्रकल्पातील बाधित पाच गावांचे भुसंपादन करण्यात आले आहे. आता बाधित गावातील नागरिकांच्या स्थलांतरणाला वेग द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

निम्न पेढी प्रकल्पाच्या कामाचा आढावा आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी श्रद्धा उदावंत, प्रसेनजित चव्हाण यांच्यासह बाधित पाच गावांचे सरपंच आणि सिंचन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

निम्नपेढी प्रकल्पात हातुर्णा, गोपगव्हाण, कुंड खुर्द, अळणगाव, कुंड सर्जापूर या गावातील जमिनीचे भूसंपादन करण्यात आले आहे. त्यामुळे या गावांत राहणाऱ्या नागरिकांना पुनर्वसित गावात स्थलांतरीत करण्यात येणार आहे. पुनर्वसित गावात प्लॉटचे वाटप करण्यात आले आहे. यासाठी पुनर्वसित गावात नागरी सुविधा पुर्ण करण्यात याव्यात. स्थलांतरणासाठी दोन लाख रूपयांची प्रती कुटुंबाला मदत



करण्यात येणार आहे. यासाठी नागरिकांना सरपंचांच्या सहायाने माहिती देण्यात यावे. गावात राहत नसलेल्या कुटुंबाचा शोध घेण्यात यावा. त्यांची सहमती घेऊन स्थलांतरासाठी देण्यात येणारा भत्ता देण्यात यावा.

बाधित गावातील कुटुंबाची मागणी असल्यास त्यांना घरकुल मंजुर करण्यात येणार आहे. यासाठी शासनाच्या नियमाप्रमाणे हप्ते देण्यात येणार आहे. गावातील पाणी, वीज, नाल्या आणि इतर सुविधांसाठी 57 कोटी रूपयांचा निधी देण्यात आला आहे. याचा योग्य विनियोग होण्यासाठी गावकऱ्यांची मदत घेतली जाणार आहे. पुनर्वसित गावात पाण्याची समस्या येवू नये, यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. पाणीपुरवठा आणि अंगणवाडी या सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले.

# मतदान आटोपले; आता 'प्रेम-शांती'चे मेसेज सुरू

## 'भांडणं' विसरा, मैत्री करा; संदेश होताहेत समाजमाध्यमांवर व्हायरल

महासागर प्रतिनिधी

**पथ्रोट, (दि.9)**– नगरपालिका निवडणुकीच्या काळात समाजमाध्यमांवर निवडणूक प्रचाराचा ज्वर जोरात होता. आता मतदान आटोपल्यानंतरच्या संदेशांना पूर आला असून %आमचा नेता लय भारी, विजयानंतर घेईल भरारी% यासह निवडणुकीचा ताप आवरण्याची आवाहने होऊ लागली आहेत. %संपले इलेक्शन, जपा रिलेशन% असे प्रेमाचे संदेश मोबाइलवर धडकू लागले आहेत.



नगरपालिका निवडणुका जाहीर झाल्यापासून विविध पक्षांसह अपक्ष उमेदवाराच्या समर्थकांना मोठा जोर चढला होता. आपल्या नेत्याचे कौतुक करण्यापासून वैयक्तिक टीकेपर्यंत तसेच इतरांचे जमेल तसे वाभाडे काढण्यापर्यंत सगळे प्रकार या काळात झाले. निवडणूक संपल्यानंतरही हा प्रकार कमी झालेला नाही. राजकीय भांडणे थांबविण्याच्या आवाहनापासून ते निवडणूक अंदाजांपर्यंत सगळ्या विषयांचे संदेश आता समाजमाध्यमावर जागा व्यापू लागले आहेत.

### प्रचार संपला, विरोध संपला

निवडणुकीतील विरोध राजकीय होता, व्यक्तिगत नाही. कोणाचे मन दुखावले असेल तर माफी असावी. कारण, राजकारण निवडणुकांपुरते असते व मैत्री ही आयुष्यभर साथ देणारी असते, चला पुन्हा मैत्रीच्या पक्षात प्रवेश करूयात, असे आवाहन करणारे तसेच %प्रचार संपला, विरोध संपला% हे संदेश फिरू लागले आहेत.

### कट्टर कार्यकर्ते पक्षीय अभिनिवेशावर कायम

सोमवारपर्यंत विविध पक्ष आणि उमेदवारांचे गुणगान करणाऱ्या संदेशांनी ग्रुप भरभरून वाहत होते. त्यांची जागा आता समजूतदारीच्या आणि राजकारणाच्या पलीकडे जाणाऱ्या आवाहनांनी घेतल्याचे चित्र विविध समाजमाध्यमांवर बुधवारी दिवसभर दिसले तर विविध पक्षांचे अनेक कट्टर कार्यकर्ते मात्र अजूनही पक्षीय अभिनिवेश कवटाळून बसल्याचे दिसून आले. 21 डिसेंबर रोजी नगरपालिका आणि एका नगरपंचायतीसाठी मतमोजणी होणार आहे.

### मैत्रीच्या पक्षात या!

प्रचाराच्या काळात दिसलेला टीकेचा सूर आणि कडवटपणा मागे ठेवा, निवडणूक संपली आता मैत्रीच्या पक्षात या. कारण गेल्या एक महिन्यापासून मित्रांसोबत कडवटपणा आला होता. आता मित्रांशी आघाडी-युती व हेच आपले मैत्रीच राजकारण होय. %भांडणं% विसरा, %आघाडी-युती% मैत्रीशी करा, जिंकला-हरला विसरा! %निवडणूक ज्वर% उतरवून, आता %दोस्तीची टाळी% मारा। असा सामाजिक व तितकाच प्रबोधनात्मक संदेश समाजमाध्यमांवर निवडणुकीनंतर व्हायरल होत आहे.

# अंजनसिंगीतील दलित वस्ती रस्ता कामात भ्रष्टाचाराचा?

## सरपंच-सचिव-ठेकेदार संगनमताने निधीचा अपहाराचा आरोप | चौकशीची जोरदार मागणी

महासागर | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे,( दि.९ )-** अंजनसिंगी येथील वार्ड क्रमांक 4 मधील दलित वस्तीतील रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अमरावती जिल्हाध्यक्ष कपिल पडघान यांनी केला आहे. दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत मंजूर सुमारे चार लाख रुपयांच्या निधीचा गैरवापर झाल्याचा दावा त्यांनी केला आहे.

कपिल पडघान यांनी या प्रकरणाचा व्हिडिओ तयार करून सोशल मीडियावर प्रसिद्ध केला असून, त्यात रस्त्याची वास्तविक स्थिती आणि मंजूर लोकेशनऐवजी इतरत्र काम केल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. शासन निधीचा अपहार करण्यात सरपंच, ग्रामसेवक (सचिव) आणि शासकीय ठेकेदार यांचे संगनमत असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे.




या कामाचा ठेका घेतलेल्या ठेकेदार उमेश शालिकराम झिबड यांनी गावातील तसेच तालुक्यातील अनेक कामे निकृष्ट दर्जाची केल्याच्या तक्रारी स्थानिकांनी केल्या आहेत. संबंधित ठेकेदाराला लायसन्स मिळाल्यापासून आजपर्यंत केलेल्या सर्व विकासकामांची सखोल चौकशी व थर्ड पार्टी ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी पडघान यांनी केली आहे. दरम्यान, हा मुद्दा अधिक गंभीर बनवणारी बाब म्हणजे, आवाज दाबण्यासाठी ठेकेदार पक्षाकडून पाच हजार रुपयांची लाच देण्याचा प्रयत्न झाला, असा आरोपही पडघान यांनी व्हिडिओद्वारे केला आहे.

> दलित वस्तीच्या विकासासाठी आलेला निधी भ्रष्टाचारासाठी वापरणे हा आर्थिकच नव्हे तर सामाजिक अपराध आहे. सरपंच, सचिव व ठेकेदार यांनी मिळून शासन आणि जनतेची फसवणूक केली आहे. या प्रकरणाची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा मी क्रांतिकारी शेतकरी संघटना तीव्र आंदोलन छेडू.
>
> **कपिल पडघान, तक्रारकर्ते.**

# हिवाळी अधिवेशनावर 12 डिसेंबरला धडकणार पेन्शन जनक्रांती महामोर्चा

## राज्यभरातून लाखो कर्मचारी नागपूरला एकवटणार

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी,( दि.९ ) -** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेतर्फे येत्या 12 डिसेंबर रोजी नागपूर येथे हिवाळी अधिवेशनावर 'पेन्शन जनक्रांती महामोर्चा' काढण्यात येणार आहे. राज्यभरातील विविध विभागांतील लाखो अधिकारी व कर्मचारी जुनी पेन्शन योजनेच्या अंमलबजावणीसाठी या मोर्चात सहभागी होणार आहेत.

संघटनेची प्रमुख मागणी अशी की, 1 नोव्हेंबर 2005 नंतर सेवेत रुजू झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना 'महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्त वेतन अधिनियम 1982' आणि 'निवृत्त वेतनाचे अंशदान 1984' अंतर्गत असलेली जुनी पेन्शन योजना भविष्य निर्वाह निधीसह लागू करण्यात यावी. या मागणीसाठी मागील काही वर्षांत संघटनेने अनेक मोर्चे, आंदोलने आणि उपक्रम राबवले आहेत. या सातत्यपूर्ण लढ्याचे फलित




म्हणून मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना फॅमिली पेन्शन लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तथापि, शासनाने लागू केलेली NPS, UPS किंवा नवी RNPS योजना संघटनेने स्पष्ट शब्दांत नाकारली आहे. सर्वांना सरसकट जुनी पेन्शन लागू न झाल्यास आंदोलन सुरूच राहणार, असा निर्धार राज्यातील पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. संघटनेचे आव्हान जाहीर झाल्यावर लाखो कर्मचारी एकवटतात, हा आजवरचा इतिहास असल्याचेही पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. संघटनेतर्फे राज्य शासनाला विनंती करण्यात आली आहे की, राज्यातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ जुनी पेन्शन योजना लागू करावी. तसेच, सर्व विभागातील कर्मचारी आणि अधिकारी यांनी 12 डिसेंबर रोजी नागपूर येथील 'पेन्शन जनक्रांती महामोर्चा'त मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### संघटनेची प्रमुख आंदोलने

मुंडन आंदोलन, अर्धनग्न आंदोलन, 'जबाब दो' आंदोलन, जलसमर्पण आंदोलन, विभागीय संमेलन, पायदळ पेन्शन वारी, आमरण उपोषण, महाअधिवेशन, कर्मचारी संप, धरणे आंदोलन अशा शेकडो आंदोलनांच्या माध्यमातून संघटनेने राज्यभरात जोरदार लढा उभारला आहे.

# ऑइलमिश्रीत डांबरामुळे ग्रामीण रस्त्यांची लागली वाट

## नागरिकांचा संताप; बांधकाम विभागाने तत्काळ दखल घ्यावी

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि.९ ) -** ग्रामीण भागातील रस्ते बांधकामामध्ये ठेकेदारांकडून निकृष्ट दर्जाचे, ऑइलमिश्रीत डांबर वापरले जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. जामगाव परिसरातील अनेक रस्ते केवळ काही महिन्यांतच उखडून खड्डेमय झाले असून, शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीवर सुरू असलेली ही बेफिकीरी थेट ग्रामीणांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणारी ठरत आहे.

मागील दोन-चार महिन्यांपूर्वीच पूर्ण झालेले रस्ते आज अत्यंत दयनीय अवस्थेत आहेत. पावसाळ्यात या रस्त्यांवर पाण्याचे डोह तयार होतात आणि नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. दोनचाकी वाहनधारक, शालेय विद्यार्थी आणि महिलांना दररोज मोठ्या धोक्याला सामोरे जावे लागत आहे. ठेकेदारांकडून डांबरात ऑइलचे मिश्रण करून खर्च वाचवण्याचा प्रयत्न झाल्याचे ग्रामस्थांचे आरोप आहेत. परिणामी रस्ते फक्त नावापुरते उरले. विकासाच्या नावाखाली होत असलेल्या या फसवणुकीबद्दल नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाने तात्काळ दखल घेऊन जबाबदार अधिकारी व ठेकेदारांवर कठोर



कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दर्जेदार सामग्री वापरली असती, तर हे रस्ते किमान 5 ते 7 वर्षे टिकू शकले असते. मात्र भ्रष्टाचाराच्या विळख्यातील या कामामुळे काही महिन्यांतच रस्ते खड्डयांत परिवर्तित झाले आहेत. दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा निकृष्ट कामांना आळा बसावा यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. ग्रामीण भागातील सामान्य जनता रोज या रस्त्यांवरून प्रवास करते. त्यांच्या सुरक्षिततेशी खेळ करून सार्वजनिक निधी वाया घालवणाऱ्या या भ्रष्ट व्यवस्थेला आता आळा घालणे अत्यावश्यक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

# शिवाजी शाळेच्या विद्यार्थ्यांचा अनोखा शैक्षणिक उपक्रम

## लघुउद्योग भेटीद्वारे शेतीपूरक व्यवसायाची प्रत्यक्ष ओळख

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी,( दि.९ ) -** येथील शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित शिवाजी उच्च माध्यमिक शाळा येथे इयत्ता 5 ते 7 वीच्या विद्यार्थ्यांसाठी लघुउद्योग भेटीचा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना बालपणा पासूनच शेती आणि शेतीला पूरक व्यवसायांची ओळख व्हावी, तसेच या व्यवसायांना उद्योगाचे स्वरूप कसे देता येते याविषयी प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने मोर्शी-खानापूर परिसरातील डेअरी फार्मला भेट देण्यात आली. फार्मवरील दूध उत्पादनापासून पनीर व इतर दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखविण्यात आली. या वेळी फार्मचे संचालक वैभव चव्हाण यांनी त्यांच्या ताब्यातील विविध जातींच्या सुमारे 70 जनावरांचे पालन-पोषण, त्यांची निगा राखण्याची पद्धत, तसेच दररोज होणाऱ्या सुमारे 400 लिटर दूध उत्पादनाची प्रक्रिया विद्यार्थ्यांना सविस्तर समजावून सांगितली. विद्यार्थ्यांना भूगोल अभ्यासक्रमातील 'शेती व शेतीपूरक व्यवसाय', 'प्राथमिक, द्वितीय व तृतीय व्यवसाय' या संकल्पनांची माहिती विद्यालयाचे उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुळकर यांनी दिली. या भेटीदरम्यान शिक्षक प्रतिनिधी म्हणून अशोक चौधरी, सारंग जाणे, प्रदीप धोटे, संदीप ठाकरे, स्नेहा ठाकरे आणि सौरभ राजस उपस्थित होते. अभ्यासक्रम अंतर्गत आयोजित या उपक्रमाचे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख व पर्यवेक्षक विठ्ठलराव नवरे यांनी कौतुक करून विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# वरुडमध्ये 53 वी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी

महासागर | प्रतिनिधी

**वरुड,( दि.९ )-** शिक्षण विभाग पंचायत समिती वरुड, तालुका गणित व विज्ञान मंडळ आणि तालुका मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 53 वी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे 10 व 11 डिसेंबर 2025 रोजी उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे उद्घाटन झाले.

प्रदर्शनीचे उद्घाटन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रिया देशमुख यांच्या हस्ते होत असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गटविकास अधिकारी खुशाल पिल्लारे भूषवत आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून नगरपरिषद मुख्याधिकारी गजानन भोयर, पोलीस निरीक्षक अर्जुन ठोसरे, गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे, उर्दू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जाबीर खान, तसेच शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित आहेत.

या विज्ञान प्रदर्शनीत तालुक्यातील 6 ते 8 आणि 9 ते 12 या गटांतील विद्यार्थी विविध विज्ञान मॉडेल्स



आणि प्रयोग सादर करीत आहेत. अधिकाधिक शाळांचा सहभाग व्हावा यासाठी सुयोग्य नियोजन व सुसज्ज मांडणी करण्यात आली आहे. बक्षीस वितरण समारंभ 11 डिसेंबर रोजी दुपारी 2 वाजता आयोजित असून तहसीलदार रामदास शेळके आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. तालुक्यातील विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांनी या विज्ञान प्रदर्शनीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक संस्थांनी केले आहे.

# मातंग समाजाच्या मागण्यांसाठी निघालेल्या पदयात्रेचे चांदूर रेल्वेत स्वागत

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. ९ ) -** मातंग समाजाच्या स्वतंत्र आरक्षणासह अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण लागू करण्याच्या मागणीसाठी लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू कसबे यांच्या नेतृत्वात काढलेल्या मुंबईङ्कनागपूर पदयात्रेचे चांदूर रेल्वे येथे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. शनिवारी (ता. 4) पदयात्रा शहरात दाखल होताच एस.आर. इंगळे, पंकज जाधव, उमेश भुजडणे, अनिल वानखडे यांसह स्थानिक महिलांनी व युवकांनी जोरदार स्वागत केले. समाजबांधवांच्या मोठ्या उपस्थितीमुळे यात्रेला उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला.

विष्णू कसबे यांनी सांगितले की, मातंग समाज अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक पातळीवर दुर्लक्षित आहे. आमचे हक्क मिळवण्यासाठी स्वतंत्र आरक्षण हा एकमेव मार्ग आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाने 1 ऑगस्ट 2024 रोजी अनुसूचित जाती उपवर्गीकरणासाठी राज्यांना अधिकार दिले असतानाही अंमलबजावणी न झाल्याने समाजात नाराजी पसरली आहे. या यात्रेतून शासनाचे लक्ष वेधत 12 डिसेंबर रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनावर मोर्चा धडकवण्याचा निर्धार करण्यात आला आहे. अत्याचारांवर आळा, प्रलंबित आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी, अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न, घरकुल व भूमिहीनांसाठी निधी वाढविणे यांसह अनेक प्रमुख मागण्या अधिवेशनात मांडल्या जाणार आहेत.

# भारतीय जनता पक्षाच्या त्या महिला उमेदवारांविरोधात प्रचंड रोष

## शिवप्रेमींकडून तीव्र निषेध | तहसीलदार व ठाणेदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार,( दि.९ ) -** भंडारा नगरपालिका निवडणूक प्रचारादरम्यान भारतीय जनता पक्षाच्या महिला उमेदवारांकडून शहरातील मुख्य चौकात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला भाजपचा दुपटा व टोपी घालून अवमान केला. याप्रकरणी शिवप्रेमी संघटनांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत आज विविध चांदूर बाजार तहसील कार्यालय आणि पोलीस स्टेशनवर मोर्चा काढला. यावेळी तहसीलदार आणि ठाणेदार यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करून आरोपी महिला उमेदवारावर तातडीने कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की शहराच्या मध्यभागी उघडपणे छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान झाला असताना



संबंधितांवर अद्याप गुन्हा दाखल न केल्याने प्रशासनाची निष्क्रियता स्पष्ट होते. त्यामुळे लोकभावना तीव्र झाल्या असून विलंब न करता संबंधितांवर कठोर पावले उचलावीत, अशी मागणीही करण्यात आली. निवेदन देताना विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये डॉ. तुषार देशमुख (प्रदेश उपाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड), सागर शिंगाडे (भारत मुक्ती मोर्चा), गौरव भोवते (बहुजन मुक्ती पार्टी), सचिन हिवराळे (माजी पंचायत समिती सदस्य), प्रीतम मानापुरे (युवक काँग्रेस), श्रेयश बर्वे (तालुकाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड), समर्थ डवरे, विशाल आवारे, समीर केनकर (प्रहार संघटना), संकल्प अढाऊ, राम मोहोड, अभिराज वाटाने, मो. रेहान व संविधान मोहोड (सामाजिक कार्यकर्ते), सुयोग बर्वे (तालुकाध्यक्ष, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद), अजिंक्य मोहोड (राजे प्रतिष्ठान) आणि भावेश चव्हाण (VBVP) यांचा समावेश होता. या प्रकरणामुळे शहरात संतापाची लाट उसळली असून प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास पुढील तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवप्रेमी संघटनांनी दिला आहे.

# श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा



महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि. ९ ) -** श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक एस. व्ही. खोडे यांनी प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिवादन अर्पण केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्ग 7 ची विद्यार्थीनी अंतरा उमेश अकर्ते हिने केले. अध्यक्ष म्हणून वर्ग 10 ची विद्यार्थिनी मधुरा देवघरे व प्रमुख पाहुण्या म्हणून एकता तिखे उपस्थित होत्या. वर्ग 5 ची पलक लांडगे हिने सादर केलेले भीमगीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले, तर कलाशिक्षक मसराम यांनीही गीताद्वारे अभिवादन केले. काही विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या कार्यावरील मनोगते व्यक्त केली.

पर्यवेक्षक व्ही. एच. चिमोटे यांनी बाबासाहेबांच्या कार्याचा उजाळा देत प्रेरणादायी विचार मांडले. विज्ञान शिक्षक पंकज बाणाईत यांनी विद्यार्थी बचत बँक आणि बाल संसद स्थापनेची घोषणा केली. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला.

# जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न कायम

## आदिवासी विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान



महासागर प्रतिनिधी

**चुरणी,( दि.९ ) -** ग्रामीण व आदिवासी भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली शिक्षक भरती अद्याप पूर्ण झाली नाही. यामुळे शाळांमधील अध्यापनाचा दर्जा खालावत असून याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर होत आहे. दुर्गम डोंगराळ व आदिवासीबहुल परिसरातील परिस्थिती विशेषत: चिंताजनक आहे. अनेक शाळांमध्ये आवश्यक त्या संख्येने शिक्षक उपलब्ध नाहीत. काही शाळांमध्ये एका शिक्षकावर दोन ते तीन वर्गांचा भार येत असून, वैयक्तिक लक्ष देणे अशक्य झाले आहे. परिणामी विद्यार्थ्यांची वाचन, लेखन व गणितातील पायाभूत कौशल्ये घसरत आहेत.

### आदिवासी विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात

आर्थिक, सामाजिक आणि भौगोलिक अडचणींचा सामना करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत आहे. विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, डिजिटल शिक्षण साहित्य यांसारख्या मूलभूत सुविधा अनेक शाळांमध्ये उपलब्ध नाहीत. काही शाळांत विद्यार्थ्यांची संख्या अपुरी असल्याने वर्गच बंद ठेवण्याची वेळ येत आहे. याप्रकारामुळे पालकांमध्ये संताप व्यक्त होत असून, शासन केवळ घोषणा करते; प्रत्यक्षात ग्रामीण विद्यार्थ्यांची दखल घेत नाही, अशी भावना व्यक्त होत आहे.

### रिक्त पदांवर तातडीने भरतीची मागणी

स्थानिक पातळीवर तात्पुरत्या नियुक्त्या कराव्यात व रिक्त पदांची तातडीने पूर्तता करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. शिक्षण विभाग व जिल्हा परिषद प्रशासनाकडून पाहण्या होत असल्याचे सांगितले जात असले, तरी त्या केवळ कागदावरच मर्यादित असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जाणकारांचे मत आहे की, ग्रामीण भागातील शिक्षण हा केवळ शासकीय विषय नसून समाजाच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

### शासनाने तातडीने निर्णय घेण्याची गरज

जर वेळेत योग्य पावले उचलली नाहीत तर याचा दीर्घकालीन परिणाम संपूर्ण पिढीवर होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने रिक्त पदांची अचूक माहिती जाहीर करून पारदर्शक पद्धतीने भरती प्रक्रिया राबवावी, अशी सर्व स्तरांतून मागणी होत आहे. ग्रामीण व आदिवासी भागाला शैक्षणिक न्याय देणे ही आजची तातडीची गरज आहे. शासनाने आता तरी गांभीर्याने दखल घेऊन हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा, अशी मागणी समाजातील विविध घटकांकडून केली जात आहे.

# अटल दौड : 25 डिसेंबरला अमरावतीत राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. ९ )** भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त अमरावती शहरात 25 डिसेंबर 2025 रोजी राज्यस्तरीय अटल दौड- हाफ मॅरेथॉन आयोजित करण्यात आली आहे. गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था आणि अमरावती जिल्हा ॲथलेटिक्स संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा पार पडणार आहे. गेल्या चार वर्षांपासून घेतली जाणारी ही मॅरेथॉन राज्यभरातील धावपटूंसाठी मोठे आकर्षण बनली असून या वर्षीही हजारो स्पर्धक अमरावतीत दाखल होण्याची अपेक्षा आहे.

या स्पर्धेसाठी 3 ते 21 किलोमीटर विविध अंतराच्या रेस ठेवण्यात आल्या आहेत. 14 वर्षांखालील, 16 वर्षांखालील, 20 वर्षांखालील गटांसाठी अनुक्रमे 3, 5 आणि 8 किमीची रेस होणार आहे.


तर 40 वर्षांवरील धावपटूंसाठी 5 किमीची स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. खुल्या गटासाठी 'रन फॉर अमरावती' अंतर्गत 3 किमी तसेच पुरुष-महिलांसाठी स्वतंत्र 10 आणि 21 किमी स्पर्धा ठेवण्यात आल्या आहेत. स्पर्धेच्या नियोजनासाठी विशेष मुख्य कार्यालय बडनेरा रोडवरील मंत्री मोटर्ससमोर उभारण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन 6 डिसेंबर रोजी राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी आमदार प्रवीण पोटे, शिवराय कुलकर्णी आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. विजेत्यांसाठी बाईक, मोपेडसह तब्बल 7 लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. स्पर्धेची ऑनलाईन नोंदणी आजपासून (7 डिसेंबर) सुरु झाली असून ती 21 डिसेंबरपर्यंत खुली राहील. नोंदणी, स्वयंसेवक समन्वय, स्पर्धकांशी संवाद आणि सर्व नियोजन संबंधित कामकाज मुख्य कार्यालयातून केले जाणार आहे.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक




# आजारांचा किडनीवर प्रभाव?



किडनी शरीरातील नको असलेले पदार्थ बाहेर टाकून रक्त शुद्धीकरणाचे काम करत असते. त्याळे आपले आरोग्य सुरक्षित राहते, म्हणूनच किडनी निरोगी राहणे फार महत्त्वाचे आहे. बऱ्याच वेळा काही आजारांचे परिणाम थेट दिसून येत नाहीत, पण त्वचेची ॲलर्जी, डोळ्यांचा रंग यांसारख्या लक्षणांवरून आपण आजारी आहोत किंवा कोणत्या आजाराला सामोरे जात आहोत हे ओळखता येते.

**किडनीची कार्यक्षमता कमी होणे**

वयानुसार शरीरातील सर्व भागांचे कार्य मंदावते; पण सध्याच्या धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे लक्ष देण्यास फारसा वेळ मिळत नाही. अवेळी खाणे, योग्य प्रमाणात पाणी न पिणे, धूम्रपान या सगळ्याचा परिणाम होऊन माणसाचा जीवनकाळ कमी होत चालला आहे. जड किंवा न पचणारे पदार्थ जास्त प्रमाणात खाल्ल्याने ते पचण्यास कठीण जातात. यामुळे किडनीला कमी वेळात जास्त काम करावे लागते आणि किडनी कमकुवत होण्याची शक्यता असते.

**लक्षणे**

शरीरावर दिसणाऱ्या काही लक्षणांवरून किडनीचा आजार ओळखता येऊ शकतो. साधारणतः थकवा येणे, चेहऱ्यावर किंवा पायांवर सूज येणे, भूक न लागणे आणि रात्री वारंवार लघवी होणे अशी लक्षणे दिसून येतात. किडनीच्या आजारावर वेळीस उपचार न केल्यास आजार पुढे वाढून उच्च रक्तदाब आणि मधुमेह यांसारखे आजार उद्भवू शकतात. त्यामुळे योग्यवेळी लक्षणे ओळखणे महत्त्वाचे आहे.

**त्वचेची ॲलर्जी**

किडनी योग्य प्रकारे शरीरातील रक्त डिटॉक्स करू शकत नाही, तेव्हा शारिरीक आरोग्याला हानी पोहोचवतील असे पदार्थ बाहेर टाकले जात नाहीत. त्यामुळे हे पदार्थ रक्तात मिसळले जातात आणि चेहऱ्यावर डाग येणे, पुरळ यणे अशा समस्यांना सामोरे जावे लागते. शिवाय त्वचेच्या रंगामध्येही फरक जाणवतो. त्वचा आणि डोळे पिवळसर होतात. हे कावीळ होण्याचे लक्षण आहे. याव्यतिरिक्त निमिया या आजारामुळेदेखील त्वचा पिवळी पडू लागते. शिवाय 'स्किन ॲलर्जी'मुळे त्वचेवर खाज येते आणि लाल चट्टे किंवा जखमही होते.

**किडनी निरोगी राहण्यासाठी उपाय**

* नियमित व्यायाम करा.

# कारणं पाठदुखीची

आरोग्यमंत्र

कारणं पाठदुखीची

प्रत्येकालाच कधी ना कधी पाठीचं दुखणं सतावतं. बैठं काम करणाऱ्या लोकांना तसंच व्यायामाचा अभाव असणाऱ्यांना पाठीच्या दुखण्याचा त्रास होतो. हे अत्यंत सर्वसामान्य असं दुखणं आहे. या दुखण्याच्या उगमाबाबत नेमकेपणाने काहीच सांगता येणार नाही. पण पाठीच्या चकत्यांशी संबंधित विकार, स्पायनल आर्थरायटिस तसंच स्नायूंशी संबंधित समस्यांमुळे पाठीचं दुखणं उद्भवू शकतं. यासोबतच पाठीच्या दुखण्याला इतर काही गोष्टी कारणीभूत ठरू शकतात. पाठीच्या दुखण्याची कारणं जाणून घेतली तर तुम्हाला नक्कीच धक्का बसेल. या कारणांबद्दल आपण अनभिज्ञ असतो. पाठीच्या दुखण्याच्या कारणांविषयी जाणून घेऊ या.



* पाठीच्या दुखण्याचे तीन प्रकार आहेत. पाठीच्या वरच्या भागाचं दुखणं, खालच्या भागाचं दुखणं आणि मधल्या भागाचं दुखणं.

* धूम्रपान करणाऱ्यांना पाठीच्या दुखण्याचा त्रास होऊ शकतो. धूम्रपान करणाऱ्यांच्या पाठीची चकती कमकुवत होते. अनेकांच्या हे लक्षातही येत नाही. वाढत्या वयानुसार पाठीच्या कण्यांमधली चकती कमकुवत होत असली तरी धूम्रपानामुळे या प्रक्रियेचा वेग वाढतो. यामुळे तीव्र स्वरूपाची पाठदुखी होते. सिगारेटमधल्या निकोटिनमुळे पाठीच्या कण्याचं नुकसान होतं.

* अतिताण पाठीच्या दुखण्याला कारणीभूत ठरू शकतो.

सावध व्हा

डॉ. मोहन सहस्त्रबुद्धे

# पुरुषांतही प्रेग्नन्सीची लक्षणे!

कधीतरी सिम्पथी वेट किंवा प्रेग्नन्सीमध्ये जोडीदाराचंही वजन वाढलंय असं ऐकलं असेल; पण काही पुरुषांसाठी हा अनुभव फक्त वजनापुरता मर्यादित राहत नाही, तर जेव्हा एखादी स्त्री प्रेग्नन्ट असते, तेव्हा तिच्या जोडीदारालाही प्रेग्नन्सीमधील काही लक्षणांसारखे परिणाम दिसू शकतात. यालाच 'कूवाड सिंड्रोम' किंवा सिम्पथेटिक प्रेग्नन्सी असं म्हणतात.

कूवाड हा शब्द इंग्रजी भाषेतील क्यूव्हर या शब्दावरून आला असून याचा अर्थ अंडी घालणे असा होतो. या सिन्ड्रोममध्ये लक्षणं प्रेग्नन्सीसारखीच दिसतात, पण ही वैद्यकीय किंवा मानसिक स्थिती नसते. मानववंश शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार, प्राचीन काळातील काही धार्मिक प्रथांमध्ये पुरुष प्रेग्नन्सीमध्ये सहभागी झाल्याचे दाखवण्यासाठी प्रेग्नन्ट बायकोच्या लक्षणांचे अनुकरण करायचे, पण आजच्या आधुनिक जगात पुरुष



भावनिकदृष्ट्या पालनपोषण आणि मुख्य प्रेग्नन्सीमध्ये सक्रिय होऊन खरोखरच सहभाग घेत आहेत. ते आपल्या जोडीदारासोबत प्रत्येक वैद्यकीय तपासणीला जात आहेत आणि गर्भसंस्कारात सहभागी होण्यासाठी पुढाकार घेत आहेत.

यामुळे आता वडील प्रेग्नन्सीमध्ये पूर्वीपेक्षा अधिक भावनिक सहभाग घेत आहेत. पुरुष आपल्या जोडीदाराच्या भावनिक आणि शारीरिक बदलांबद्दल अधिक जागरूक झाले आहेत आणि म्हणूनच 'कूवाड सिंड्रोम' किंवा 'सिम्पथेटिक प्रेग्नन्सी' सध्या अधिक प्रमाणात दिसत आहे.

**पुरुषांमध्ये दिसू शकणारी सामान्य लक्षणं**

* मळमळणे किंवा उलट्या होणे
* भूकेत बदल होणे
* वजन वाढणे
* पोट फुगल्यासारखे वाटणे
* मूड स्विंग्स
* झोपेच्या पॅटर्नमध्ये बदल
* पाठदुखी
* अन्नाची विशेष क्रेविंग्स किंवा चीड येणे

**'कूवाड सिंड्रोम' होण्याची कारणं**

हा सिंड्रोम पालक बनण्याच्या अनुभवामुळे होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक बदलांमुळे होतो, असं समजलं जातं. पुरुष आपल्या प्रेग्नन्ट जोडीदारासोबत प्रेग्नन्सीमध्ये भावनिकदृष्ट्या अधिक सहभागी होतात, तेव्हा ते अनपेक्षितपणे आपल्या जोडीदाराच्या लक्षणांचा अनुभव घेऊ शकतात. या परिस्थितीत पुरुष खरोखरच प्रेग्नन्ट नसतात, पण ही लक्षणं मानसिक भावना, ताण आणि घरातील वातावरणातील बदलांमुळे होणाऱ्या हार्मोनल प्रतिक्रियांमुळे दिसतात. या प्रकारच्या अनुभवामुळे पुरुषांना जोडीदारासोबत अधिक जवळीक आणि सहानुभूती अनुभवता येते आणि दोन्ही पालकांसाठी ही वेळ अधिक अर्थपूर्ण बनते.

आरोग्य चर्चा

डॉ. मेघा दळे

# थंडी आणि सर्दी

ऋतूबदलामुळे सगळीकडे सर्दी–खोकला आणि फ्लूचं प्रमाण वाढलं आहे. रोग नियंत्रण आणि प्रतिबंधात्मक केंद्राच्या अहवालानुसार मुलांचं शाळा बुडवण्याचं तसंच प्रौढांचं ऑफिसला न जाण्याचं सर्दी हे प्रमुख कारण आहे. सर्वसाधारण सर्दीला कारणीभूत ठरणाऱ्या विषाणूंची संख्या तब्बल २०० आहे. पण त्यातही ऱ्हिनोव्हायरसमुळे सर्दी होण्याचं प्रमाण सर्वाधिक आहे. असं असलं तरी सर्वसाधारणपणे आढळणाऱ्या या विषाणूंविरोधात कोणतंही औषध उपलब्ध नाही. सर्दीवर प्रभावी औषध शोधण्यात वैद्यकीय क्षेत्राला अद्याप यश आलेलं नाही. ऱ्हिनोव्हायरस इतक्या सर्वसामान्यपणे आढळणारा विषाणू आहे की तो वारंवार हल्ला करू शकतो. बरी झालेली सर्दी पुन्हा उलटू शकते. दोन दिवसात पुन्हा सर्दी होऊ शकते.

एका ऋतूत एका वेळेला सर्दी होणं अगदी सर्वसामान्य आहे. अनेकांना अशी सर्दी होते. तर काहींना वारंवार सर्दीचा त्रास होतो. सर्दीला कारणीभूत ठरणारे २०० पेक्षा जास्त विषाणू असल्याने एकाच वेळी दोन विषाणू हल्ला करू शकतात किंवा एकदा झालेली सर्दी बरी झाल्यानंतर लगेच दुसऱ्या प्रकारच्या विषाणूमुळे सर्दी होऊ शकते. पुन्हा पुन्हा सर्दी का होते, असा विचार करत असाल तर त्यामागे विषाणूंच्या विविध प्रकारच्या प्रजाती हे कारण असू शकतं. सर्दीच्या विषाणूची लागण झाल्यानंतर लक्षणं दिसायला काही कालावधी लागतो. प्रत्येक जंतूसंसर्गाचा ठराविक कालावधी असतो. विशिष्ट परिस्थितीमध्ये लोक बराच काळ आजारी असल्याची तक्रार करतात. बरेच उपाय करून, औषधं घेऊनही सर्दी जात नाही. एका विषाणूनंतर दुसऱ्या विषाणूचा होणार संसर्ग हे यामागचं कारण असू शकतं. यामुळे बराच काळपर्यंत सर्दी जात नाही.



सर्वसाधारण सर्दी हा वेगाने पसरणारा विकार आहे. एका रूग्णामुळे दुसऱ्याला याची लागण होऊ शकते. हिवाळ्यात सर्दी आणि फ्लूचं प्रमाण वाढतं. यासोबत तीव्र स्वरूपाची लक्षणंही जाणवतात. थंडीतला बराच काळ लोक घरात असतात. शिंकणं, खोकणं यामुळे सर्दीचे विषाणू हवेत पसरतात आणि कुटुंबातल्या अनेकांना एकाच वेळी सर्दी होते. थंड वातावरणात सर्दीचे विषाणू जास्त वेळ तग धरून असतात. विविध पृष्ठभागांवर चिकटलेले विषाणू शरीरात प्रवेश करून सर्दीला कारणीभूत ठरतात. थंडीच्या काळात तळलेले पदार्थ जास्त खातो. पोषक आहाराच्या अभावी शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते आणि विषाणूंचा संसर्ग लगेच होतो. सर्दीपासून पूर्णपणे बचाव करणं शक्य नसला तरी काही प्रमाणात तिला आळा घालू शकतो. खाण्याआधी हात धुणं, बाहेरून आल्यानंतर हातपाय स्वच्छ धुणं, फळं, भाज्यांचं सेवन अशा उपायांनी सर्दीला दूर ठेऊ शकतो. शिंकताना, खोकताना तोंडावर हात ठेवणं, नियमित व्यायाम करणं यामुळेही सर्दीला प्रतिबंध करता येतो.

ऋतूबदल

# मानवाला प्रथमच 'बर्ड फ्लू'ची लागण

मानवी जीवनावर एक गंभीर संकट ओढवण्याची शक्यता आहे. पहिल्यांदाच मानवाला प्राण्यांमध्ये आढळणाऱ्या 'बर्ड फ्लू' विषाणूची लागण झाली आहे. या दुर्मिळ एच ५ एन ५ 'एव्हीयन इन्फ्लूएंझा'मुळे एका वृद्ध व्यक्तीची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे.



'ग्रे हार्बर काउंटी'मध्ये राहणाऱ्या या व्यक्तीला सुरुवातीला ताप, चिडचिडेपणा आणि श्वास घेण्यास त्रास होत होता. या व्यक्तीची चाचणी केल्यानंतर त्याला पक्ष्यांमध्ये आढळणाऱ्या एच ५ एन ५बर्ड फ्लूचा संसर्ग झाल्याचे समोर आले आहे. सध्या त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. 'बर्ड फ्लू' हा आजार प्रामुख्यांमध्ये आढळतो; मात्र आता या आजाराची विषाणूने मानवाच्या शरीरात प्रवेश केला आहे. या व्यक्तीला या गंभीर आजाराची लागण कशी झाली, याचा शोध घेतला असता असे आढळले, की या व्यक्तीच्या अंगणात कोंबड्या आणि इतर पाळीव पक्षी आहेत. यातील दोन पक्ष्यांचा अलिकडेच मृत्यू झाला होता. तसेच ही व्यक्ती अशी ठिकाणी वास्तव्यास आहे, की या ठिकाणी सहजपणे जंगली पक्षी पोहोचू शकतात. त्यामुळे हे पाळीव प्राणी किंवा जंगली पक्ष्यांच्या संपर्कात आल्यामुळे या व्यक्तीला हा गंभीर आजार झाला आहे.

**एच ५ एन ५ विषाणूचा धोका किती?**

आतापर्यंत मानवाला या विषाणूची लागण झालेली नव्हती. तसेच हा विषाणू जास्त संसर्गजन्य नाही. त्यामुळे या रोगाच्या संसर्गाचा धोका खूप कमी आहे; मात्र काही तज्ज्ञांनी असंही म्हटलं आहे, की या विषाणूमध्ये काही जनुकीय बदल झाले असावेत, त्यामुळे मानवाला लागण झाली असावी. एच ५ एन १ या विषाणूची लागण अमेरिकेतील जंगली पक्षी, पाळीव कोंबड्या, गायी आणि काही मानवांना झालेली आहे.


व्याधी विचार

डॉ. अरुण गव्हाणे

# हिवाळ्यात किडनी स्टोनचे प्रमाण अधिक

हिवाळ्यात तापमानाचा पारा खालावल्याने रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. त्यामुळे मूत्रपिंडावरही त्याचा दाब वाढतो. शरीरातील अतिरिक्त द्रव आणि हानिकारक रसायने काढून टाकण्यासाठी मूत्रपिंडाला अधिक रक्त प्रवाहाची आवश्यकता असते; परंतु रक्तवाहिन्या आकुंचन पावल्यामुळे आवश्यक त्या प्रमाणात रक्त मिळत नाही आणि मूत्रपिंडावर अतिरिक्त दबाव वाढतो. थंडीत तहान कमी झाल्याने बरेचजण पाणी कमी पितात. त्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते. पाण्याच्या कमतरतेमुळे रक्त घट्ट व्हायला लागे.

लघवीतील खनिजे आणि क्षारांची पातळी वाढते, तेव्हा हे स्फटिक एकत्र होऊन दगडांचे रूप घेतात. कॅल्शियम, ऑक्सलेट आणि युरिक ॲसिडपासून तयार झालेले हे खडे मूत्रमार्गात अडथळा आणतात. त्यामुळे वेळीच उपचार न



केल्यास तीव्र वेदना, संसर्ग किंवा मूत्रपिंडाचे नुकसान होते.

**मूतखडा होण्याचे कारणे**

पाणी कमी पिणे, आहारातील मीठाचे वाढलेले प्रमाण, आहारातील प्रथिनांचे वाढते प्रमाण, चहा, कॉफी किंवा सॉफ्ट ड्रिंक्सचे मोठ्या प्रमाणातील सेवन आणि बैठी जीवनशैली हे मूतखड्यासारख्या समस्येस कारणीभूत ठरतात. जास्त वेळ बसून राहणे आणि शारीरिक हालचालींचा अभाव हिवाळ्यातील निर्जलीकरणामळेदेखील मूत्र अधिक आम्लयुक्त होते.

**मूतखड्याची लक्षणे?**

पाठीत किंवा ओटीपोटात तीव्र वेदना होणे, लघवी करताना जळजळ, लघवीवाटे रक्त येणे, मळमळणे किंवा वारंवार लघवी करण्याची इच्छा होणे.

**उपचार**

हा त्यांच्या आकारावर आणि मूतखड्याच्या स्थानानुसार ठरविला जातो. लहान खडे बहुतेकदा जास्त द्रव पदार्थांचे सेवन आणि वेदना कमी करून नैसर्गिकरित्या निघून जातात.

व्याधी विचार

डॉ. कुंदन गायकवाड

# दुष्परिणाम उंच टाचेच्या चपलांचे

सणवार असो किंवा लग्नसमारंभ किंवा एखादी मिटिंग, महिला उंच टाचेच्या चपलांना प्राधान्य देतात. उंच टाचेच्या चपलांमुळे व्यक्तिमत्त्व खुलत असलं तरी त्याचे बरेच दुष्परिणाम आहेत. हे दुष्परिणाम जाणून घेतले तर उंच टाचेच्या चप्पल घालायचा मोह तुम्ही नक्की टाळाल.

* उंच टाचेच्या चप्पल घातल्यानंतर आपण ताठ चालतो. यामुळे पायांची हालचाल नैसर्गिक पद्धतीने होत नाही. यामुळे सगळा



भार गुडघ्यांवर येतो. गुडघेदुखी सुरू होते आणि भविष्यात ऑस्टिओआर्थ्रायटिसचा धोका उद्भवतो.

* उंच टाचेच्या चपलांमुळे पाठीचं दुखणं मागे लागू शकतं. अशा चपलांमुळे शरीराचं समतोल साधला जात नाही आणि पाठीचा खालचा भाग दुखू लागतो.

* दिवसभर उंच टाचेच्या चप्पल घालून फिरल्यानंतर पावलं आणि टाचा दुखू लागतात.

* चपलांच्या आकारामुळे नसांना होणाऱ्या रक्तपुरवठ्यात अडथळे येऊ शकतात. यामुळे डोकेदुखीची समस्या निर्माण होऊ शकते.

* आपल्या पावलांचा आकार सर्वसाधारणपणे लांबुळका चौकोनी असतो. दुसरीकडे उंच टाचेच्या चपला निमुळत्या आणि रूंद असतात. यामुळे नखांची वाढ खुंटू शकते.


आपण कुठे चुकतो?

# स्मार्ट फोन आणि स्मार्ट दुखणी

कामापुरता स्मार्टफोन वापरणं याची व्याख्या दिवसेंदिवस बदलत चालली आहे. चॅटिंग करणं, व्हॉट्स ॲपचे मेसेज पाहणं, तासन्तास फोनवरच बातम्या पाहणं, चित्रपट पाहणं, यू ट्यूबवर व्हिडिओ अपलोड– डाऊनलोड करणं, इंटरनेटवर सर्च करणं अशा अनेक कारणांमुळे बहुतांश लोक आयुष्यातला बराचसा वेळ स्मार्टफोनवरच घालवत आहेत. याचे अनेक शारीरिक, मानसिक दुष्परिणाम असून बहुतेक सर्व व्यसनांप्रमाणे त्या व्यक्तीला आपण व्यसनी झालो नाही असंच वाटतं. एकाच ठिकाणी बसून आणि ठरावीक कोनात मान ठेवून सतत मेसेज टाईप केल्यामुळे किंवा वाचल्यामुळे मानेचे आजार जडतात. मणक्याचे व पाठीच्या कण्याचे आजार होतात. सांधे आखडणं, हाता–पायांच्या बोटांना मुंग्या येणं, डोकं बधीर होणं, डोळ्यांवर झापड आल्यासारखं वाटणं, डोकं जड होणं आणि दुखू लागणं, दृष्टी मंदावणं, डोळ्यांमधून पाणी येणं तसंच कानांमध्ये सतत ईअरफोन अडकवून गाणी ऐकणं, व्हिडिओ पाहणं यासारख्या प्रकारांमुळे कमी ऐकू येण्यापासून बहिरेपणा येण्यापर्यंतच्या टप्प्यापर्यंत पोहोचणं, रात्री अपुरी झोप घेऊन मोबाईलवर गेम खेळणं, चित्रपट पाहणं यामुळे डोळ्यांमध्ये मोतीबिंदू आणि काचबिंदूसारखे आजार होणं अशा अनेक व्याधींना सामोरं जावं लागतं.

या सगळ्याचा परिणाम पचनसंस्थेवर आणि मनावर होतो. दीर्घ काळ मोबाईलवर बोलत राहिल्यानं शरीराची हालचाल होत नाही. त्यामुळे अंगदुखी, सांधेदुखीबरोबरच मधुमेहासारख्या दुर्धर व्याधीही जडत असल्याचं संशोधनांमधून समोर येत आहे. याखेरीज हालचाल कमी झाल्यामुळे स्थूलत्व येतं. उच्च रक्तदाबाचा त्रास सुरू होतो आणि मानसिक दुष्परिणाम याहून भयंकर असतात. काही करावंसं न वाटणं, नैराश्य येणं, निर्णयक्षमता कमी होणं यासारख्या लक्षणांनंतर मेंदूची कार्यशक्ती क्षीण होण्याच्या त्रासदायक आजाराला तोंड द्यावं लागतं. स्वतंत्र विचारांची शक्ती कमी होणं, चालताना तोल जाणं असे प्रकारही घडू लागतात. हे व्यसन सोडणं कठीण झाल्यामुळे आजारांच्या खोल गर्तेत जाते.

मध्यंतरी आत्महत्येला प्रवृत्त करणाऱ्या ब्ल्यू व्हेलसारख्या गेम्समुळे लहान मुलांपासून तरुणांपर्यंतच्या वयोगटातील लोकांनी जीव गमावल्याच्या घटना घडल्या होत्या. मुलांना गुन्हेगारीला प्रवृत्त करण्यासाठी स्मार्टफोनचा वापर करणाऱ्या टोळ्यांनाही पकडलं गेलं आहे. याखेरीज अश्लील चित्रफिती टाकणं, त्यासाठी धमकावणं आणि ब्लॅकमेलिंग करणं यासारखे प्रकार वाढत आहेत. खासगीपणा चव्हाट्यावर आणणारं हे साधन हाताळताना अत्यंत सावधपणा बाळगला पाहिजे हे अनेकांच्या लक्षात येत नाही आणि त्यातूनच मानसिक चिंता आणि विवंचनांमधून आत्महत्या आणि



खुनासारखे प्रकार वाढत चालले आहेत. एका संशोधनानुसार, भारतीय लोक ॲप्सवर रोज सरासरी तीन तास घालवतात.

सध्या स्मार्टफोनचं आणि गॅजेट्सचं व्यसन सोडवण्यासाठी अनेकजण उपचार घेत आहेत, असं मानसोपचारतज्ज्ञ सांगतात. यात सहसा १६ ते २० वयोगटातील रुग्णांची संख्या सर्वाधिक असते. सतत ऑनलाईन राहण्याची जबरदस्त इच्छा हे या व्यसनाचं लक्षण असतं. सोबत मोबाईल नसेल तर अस्वस्थपणा आणि निराशा जाणवणं हे दुसरं लक्षण. कामं बाजूला ठेवून मोबाईलचा वापर करणं, इतरांच्या बोलण्याकडे लक्ष नसणं, व्यक्तींशी बोलण्यात रुची नसणं, सतत नोटिफिकेशन तपासत राहणं आणि नवीन नोटिफिकेशन आलं नसेल तर निराश होणं, फोनची रिंग होत असल्याचा किंवा तो व्हायब्रेट होत असल्याचा भास होणं, मोबाईल दूर ठेवला तर चिडचिड ही काही लक्षणं आहेत.

या व्यसनातून सुटका कशी करून घ्यावी हे महत्त्वाचं आहे. यातील पहिली पायरी म्हणजे इतर व्यसनांप्रमाणेच आपल्याला व्यसन लागलं आहे आणि त्यामुळे लक्ष कामावर केंद्रित होत नाही किंवा चुका होत आहेत हे मान्य करावं लागतं. त्यातून बाहेर पडण्याची तिची इच्छा असावी लागते. अशा वेळी अंथरुणात मोबाईल घेऊन झोपणं थांबवलं पाहिजेच; शिवाय झोपण्याआधी किमान ३० ते ४० मिनिटं मोबाईल तसंच इतर गॅजेट्सपासून दूर राहण्याची सवय लावून घेतली पाहिजे. दीड तासाहून अधिक काळ वापरल्यास फोन सक्तीनं बाजूला ठेवावा. त्यानंतर दहा वेळा डोळ्यांची उघडझाप करावी. डोकं पाच वेळा डावीकडून उजवीकडे आणि उजवीकडून डावीकडे वळवावं. मनगटाची हालचाल घड्याळाच्या काट्याच्या दिशेनं आणि नंतर विरुद्ध दिशेनं करावी. यामुळे शारीरिक अकार्यक्षमता कमी होते.

बहुतेक सर्वच मोबाईल फोनमध्ये ब्ल्यू फिल्टर ॲप किंवा फीचर असतंच. सूर्यास्त झाला की ही ॲप सुरू व्हावीत अशा प्रकारे सेट केलेली असतात. त्यांच्या सातत्यपूर्ण वापरामुळे मनाला झोपण्याआधी ते ॲप सुरू केलंच पाहिजे अशी सवय लागते. यासाठी तज्ज्ञ असा सल्ला देतात की नोटिफिकेशन्स किंवा व्यसनं जडवणारी ॲप इन्स्टॉल करू नका. केली असतील तर काढून टाका. रात्रीच्या वेळी आपला फोन सायलेंट मोडवर टाका. सगळ्या मेल्स चेक करत बसण्यापेक्षा फक्त अतिमहत्त्वाच्या किंवा गरजेच्या मेल्स चेक कराव्या यासाठी मेलचं वर्गीकरण करणारी ॲप्स आहेत.

सामाजिक

## महामार्गावरील उड्डाणपूल निर्मितीसाठी
# आणखी किती निष्पापांचे बळी घेणार?

**■ रघुवीरसिंह चौहान, यवतमाळ, दि. ९ :** यवतमाळमधून गेलेल्या, नागपूर, बुटीबोरी-तुळजापूर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर, यवतमाळच्या वनवासी मारुती मंदिराजवळ, भव्य स्वरूपातील उड्डाणपूल निर्मितीसाठी, मूळचा सिमेंटमार्ग खोदून नष्ट केला आहे. त्यामुळे या महामार्गावर वाहतुकीत प्रचंड कोंडी होत आहे.

मागील काही महिन्यात या ठिकाणी झालेल्या अपघातात १२ निष्पाप लोकांचे बळी गेले आहेत. आणि दिवसाकाठी किरकोळ अपघातांमध्ये तर डझनावर लोकं दररोजच जखमी होतात. या ठिकाणी सरकार आणखी किती निष्पाप लोकांचे बळी घेणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बुटीबोरी-तुळजापूर हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ यवतमाळ मधून गेला आहे. विदर्भ-मराठवाडा वेस्ट महाराष्ट्र असा जोडलेला हा राष्ट्रीय महामार्ग आहे. यवतमाळ शहराच्या दक्षिण टोकाला असलेल्या वनवासी मारुती मंदिराजवळून हा महामार्ग पुढे गेला आहे. काही वर्षांपूर्वीच हा राष्ट्रीय महामार्ग सिमेंट काँक्रीटने बांधल्या गेला.

अत्यंत सुस्थितीत असलेला हा सिमेंट काँक्रेटचा महामार्ग, यवतमाळच्या वनवासी मारुती मंदिरासमोरून खोदून नष्ट केला आहे. या मंदिरापासून समोर भव्य स्वरूपाचा उड्डाणपूल निर्माण करण्यात येत आहे.

हे जरी खरे असले तरी, हा राष्ट्रीय महामार्ग खोदून नष्ट केल्यानंतर, या ठिकाणाहून होणाऱ्या प्रचंड प्रमाणातील जड वाहतुकीमुळे, दिवसाकाठी हजारो दुचाकी व चारचाकी कारधारकांना, येणाऱ्या अडथळ्यांमुळे मागील काही महिन्यात या ठिकाणी आतापर्यंत निष्पाप लोकांचे १२ बळी गेले आहेत. त्यात दुचाकी आणि चार चाकी वाहन धारकांचाही समावेश आहे.

या उड्डाण पुलाचे प्रत्यक्ष बांधकाम अजून पर्यंत सुरू झाले नाही. परंतु हा राष्ट्रीय महामार्ग खोदून वर्ष होत आहे. या ठिकाणाहून होणारी वाहतूक अनेकांच्या लक्षातच येत नाही, कुणाकडून कसे जाणे-येणे करावे? हे काहीही कळायला मार्ग नाही. त्यातच या ठिकाणी माती, मुरूम मिश्रीत कच्चा अर्धचंद्र राऊंड मार्ग तयार करण्यात आला आहे. त्यामुळे पावसाळ्यात चिखल तर उन्हाळा, हिवाळ्यात पूर्णतः माती या मार्गावर असते.

हा पाऊण ते एक किलोमीटरचा मार्ग पार करताना, दररोज हजारो दुचाकी वाहनधारकांना प्रचंड माती-मुरुम, दगड मिश्रित कच्च्या रस्त्यावरून जाता- येताना धुळीसह कठीण सामस्येचा सामना करावे लागते. त्यातच काही ठिकाणी जाणे- येणे एकाच बाजूने करावे लागते.

या मार्गावरील अडथळे कसे पार करावे हे सुद्धा अनेकांना कळेनासे झाले आहे. ज्या ठिकाणी हा उड्डाणपूल निर्माण होणार आहे त्या ठिकाणची वाहतूक अत्यंत क्लिष्ट केली आहे. त्यामुळे या ठिकाणी होणाऱ्या दिवसागणिक अपघातांची संख्या प्रचंड असते. हा मार्ग दोन्ही बाजूने खोदल्यानंतर आतापर्यंत या ठिकाणी झालेल्या अपघातांमध्ये १२ निष्पाप लोकांचे प्राण गेले.आणि किरकोळ अपघात तर तासातासाला होत असतात.

वनवासी मारुती मंदिरासमोरून, वाघाडी नदी पार करेपर्यंत, कोरडी माती,मुरुम, दगड गिट्टी इत्यादींचा सामना करीत वाहनधारकांना चालावे लागते. चार चाकी वाहन धारक कसेबसे मार्ग क्रमण करतात. परंतु, दुचाकी वाहनधारकांना वरील सर्व समस्यांसह पावसाळ्यात चिखलाचा सामना करीत चालणे अत्यंत कठीण असते. त्यामुळे होणाऱ्या अपघातात अनेकांना प्राण गमवावे लागते. तर कित्येकांना जखमी व्हावे लागते. कारण या मार्गाने जड वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते.

या मार्गावरून दिवसाकाठी हजारो जड वाहने जातात. त्यात ट्रक, हायवा ट्रक, ट्रॅक्टर, मेट्याडोअर, एसटी बसेस, ट्रॅव्हल्स व अन्य चार चाकी वाहने मोठ्या प्रमाणात ये-जा करतात, यवतमाळ शहरात राहणारे शेतकरी, व्यापारी, नोकरवर्ग व सामान्य जनता, हजारोच्या संख्येने याच मार्गावरून दररोज आपल्या दुचाकी, चार चाकी वाहनांनी जवळा, आर्णी, महागाव उमरखेड येथे नियमित जाणे येणे करणाऱ्यांची संख्या ही हजारोच्या घरात आहे.

एवढी प्रचंड वाहतूक या राष्ट्रीय महामार्गाने होत आहे. परंतु वनवासी मारुती मंदिराजवळ होणाऱ्या उड्डाणपुलासाठी जो मार्ग दोन्ही बाजूंनी खोदून ठेवला आहे त्यामुळे दररोज हजारो लोकांना प्रचंड त्रासाला सामोरे जाणे भाग पडत आहे? हा उड्डाणपूल निर्मितीसाठी कोणाचीही हरकत नाही. परंतु उड्डाणपूल निर्माण होईपर्यंत या मार्गावरील जड वाहतूक अन्यत्र वळती करावी, आणि ज्या ठिकाणी खोदकाम करून मार्ग क्लिष्ट करून ठेवला आहे.

त्या ठिकाणी तातपुरते डांबरी रस्ते निर्माण करावे म्हणजे, उड्डाणपूल तयार होईपर्यंत, त्या डांबरी रस्त्यावरून दुचाकी वाहनधारकांसह लहान चारचाकी वाहनधारकांना जाणे येणे सोयस्कर होईल. या मार्गाने जड वाहतूक कायम राहिली तर या ठिकाणी आणखी शेकडो, हजारो निष्पाप लोकांचे प्राण जाणे कोणीही टाळू शकणार नाही.

तसेच किरकोळ अपघातांमध्ये जखमी होणाऱ्यांची संख्या भरपूर असते व पुढेही राहणार आहे. जर सरकारला लोकांचे प्राण जाऊ नये असे वाटत असेल तर वरील प्रमाणे सुधारणा करावी. अन्यथा मोठ्या आंदोलनाचा सामना करावा लागू शकतो.

# न्यू तापडिया नगर रेल्वे पुलाचे काम रखडले





## हिवाळी अधिवेशनात प्रश्न मार्गी लावा : नागरिकांचा संताप उफाळला : जनआंदोलनाचा इशारा

**अधिवेशन विशेष**

**■ पुरूषोत्तम ढोले, अकोला, दि. ९ :** न्यू तापडिया नगर अकोला येथील रेल्वे पूल गेल्या अनेक वर्षांपासून कामाच्या नावाखाली बंद ठेवण्यात आला आहे. वरचा आणि खालचा मार्ग दोन्ही बंद असल्याने नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला व रोजंदारी कामगार यांचे अक्षरशः हाल होत आहेत.

पुलाच्या बंदिस्त अवस्थेमुळे परिसरातील हजारो नागरिकांना रोज दहा किलोमीटरचा फेरा मारावा लागतो, तर चौकात हेलपाटे होत आहेत. निर्माण होणारी प्रचंड वाहतूक कोंडी ही अपघातांचे मूळ कारण ठरत आहे.

शहराचा हा महत्त्वाचा संपर्कमार्ग ठप्प झाल्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असूनही शासन, प्रशासन आणि स्थानिक जनप्रतिनिधी मात्र सुस्त अवस्थेत असल्याचे चित्र जनतेच्या मनात प्रखर नाराजी निर्माण करत आहे. कामाच्या नावाखाली वर्षानुवर्षे नागरिकांना वेठीस धरल्याची भावना आता अधिक तीव्र झाली आहे.

शालेय विद्यार्थ्यांचा जीव मुठीत .दररोज शाळा-कॉलेजकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या बंद पुलामुळे मोठ्या फेऱ्याने जावे लागते. वाहतूक कोंडी, रस्ता बदल, अवघड मार्ग आणि वाढलेला प्रवास हा मुलांच्या सुरक्षिततेसाठी धोकादायकच ठरत आहे. पालकांना सकाळ-संध्याकाळ त्रस्त करणारी ही परिस्थिती पाहून अनेक पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

**वाहतूक कोंडी आणि अपघातांचे प्रमाण**

चौका चौकातील अडथळे, सिग्नल व्यवस्थेचा अभाव, दोन्ही बाजूंनी धावणारी वाहने आणि पूल बंद असल्यामुळे सर्व वाहनांचा भार या रेल्वे स्टेशन चौकावर येत असल्याने अपघातांची संख्याच वाढली आहे. अनेकांना किरकोळ ते गंभीर दुखापती झाल्या असूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना होताना दिसत नाही.

**'निद्रिस्त' जनप्रतिनिधींवर टीकेची झोड**

स्थानिकांमध्ये असा सूर उमटत आहे की, आमदार-खासदारांनी केवळ आश्वासनांची पेरणी करून लोकांच्या संयमाची परीक्षा घेतली आहे. पुलाचे काम केव्हा पूर्ण होणार? कोण जवाबदार? रस्त्यांच्या या दयनीय स्थितीकडे कोण लक्ष देणार? याबाबत आजवर कोणतीही स्पष्ट माहिती जनतेला दिली गेलेली नाही.

जनतेच्या समस्या प्रत्यक्षात पाहूनही जनप्रतिनिधी 'झोपेचे सोंग' घेत बसल्याची भावना या नागरिकांमध्ये तीव्र आहे.

**अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्याची मागणी**

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न तातडीने उपस्थित करण्यात यावा, पुलाचे काम जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात यावेत, असे नागरिकांचे स्पष्ट मत आहे. हा प्रश्न फक्त विकासाचा नसून जीवित सुरक्षेचा आहे.

**जनआंदोलनाचा इशारा**

न्यू तापडिया नगर व परिसरातील रहिवाशांनी पुन्हा एकदा इशारा दिला आहे. आमदार-खासदारांनी झोपेतून उठून जनतेचे प्रश्न सोडवावेत. पुलाचे काम त्वरित पूर्ण करा, अन्यथा मोठ्या जनआंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

नागरिकांच्या संयमाचा अंत आता जवळ आला आहे. शासन-प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करीत न्यू तापडिया नगर रेल्वे पुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा संतप्त जनतेचा उद्रेक रोखता येणार नाही, हे निश्चित. अशी मागणी निर्भय बनो जन आंदोलनाच्या वतीने केली आहे.

## धातूंच्या वस्तूंचा अनोखा संग्रह



**लोकमानस**

तांब्या-पितळेच्या अनेक घाटदार, कलाकुसर असलेल्या वस्तू दैनंदिन वापरातून कशा हळूहळू गायब झाल्या, कळलेही नाही. आता त्या वस्तू पाहायलाही मिळणार नाहीत, मात्र पुण्यात या वस्तूंचे एक संग्राहक आहेत, त्यांनी गोळा केलेला संग्रह पाहण्यासाठीदेखील उपलब्ध आहे.

गिरीश पोटफोडे यांनी इमारतीच्या तळमजल्यावर संग्रहाचे आनंदी संसार प्रदर्शन उभे केले आहे. तिथे लहानशा जागेत शेकडो वेगवेगळ्या वस्तू छान झळाळत्या मांडून ठेवलेल्या आहेत. याची सुरुवात कशी झाली, असे विचारताना गिरीश यांनी इतिहासकाळापासून आठवणींचा, माहितीचा एक विस्तृत पटच उभा केला.पुण्यात ऐतिहासिक काळापासून, धातूच्या पत्र्यापासून भांडी तयार करण्याचे काम कसब्यात चालत आले आहे. गिरीश सांगतात की, प्रामुख्याने पितळेच्या पत्र्यापासून भांडी तयार केली जात. हे काम फार कष्टाचे असायचे. पुढे काळ बदलत गेला, यंत्रावर धातूकाम सुरू झाले. तांब्या-पितळेच्या भांड्यांना पर्याय आले. इथली मागणी कमी झाली, पुढच्या पिढ्यांनी शिक्षणाची वाट धरली आणि आज अनेक क्षेत्रांत ते करिअर करीत आहेत.

गिरीश पोटफोडे यांचे शिक्षण नुमवित झाले. त्यांचे वडील शिक्षणाबाबत खूप आग्रही होते. शिक्षणानंतर ते टेल्कोत ते रुजू झाले. गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ ते समाजकार्यात सक्रिय आहेत. विशेषतः शिक्षण, संस्कार यांच्याशी संबंधित विषयात ते कार्यरत आहेत.

ते सांगतात की, संस्थेच्या शताब्दी वर्षात तांब्या-पितळेच्या वस्तूंचे एक प्रदर्शन भरवण्यात आले होते. तसेच २०१७ मध्ये सव्वाशेव्या वर्षीही एक प्रदर्शन भरवले. तिथे विक्रीचीही सोय केली होती.

मात्र, २५ वर्षांनी होणारी ही प्रदर्शने काही दिवसांसाठीच होती. त्याचवेळी कायमस्वरुपी प्रदर्शने भरवावीत, अशी मागणी होती; मात्र जागेची अडचण होती.

कोविडनंतर तांब्या-पितळेच्या भांड्यांचे महत्त्व पुन्हा एकदा लोकांच्या लक्षात येत होते. त्यांच्या आजींना या भांड्यांची फार आवड. संसारात घंगाळे, घागरी आणि पाणी तापवण्याच्या बंबापासून खूप वस्तू त्यांनी हौसेने जमवल्या होत्या. त्या गिरीशंकडे होत्याच. तळमजल्यावरची मुलांच्या अभ्यासासाठी घेतलेली जागा रिकामी होती. तिथेच या संग्रहाचे प्रदर्शन मांडण्याची कल्पना उभयतांनी प्रत्यक्षात आणली. आनंदी हे त्यांच्या आजीचे नाव. तेच त्याला दिले आणि आनंदी संसार आकाराला आला.

आज येथे विविध प्रकारचे पाण्याचे जग, फिरकीचा तांब्या, पानसुपारीचे डबे, दिवे, स्वयंपाकाची आणि जेवणाची सर्व प्रकारची भांडी, घंगाळे, पाण्याच बंब, कीचेन, शोभेच्या वस्तू, अगदी पितळेची पर्सही आहे.

महाराष्ट्रातली वेगवेगळ्या घाटांची भांडी, कळशा त्यांच्याकडे आहेत. मोठी भांडी आहेत आणि अगदी भातुकलीची भांडीही आहेत. तांबे, पितळ आणि चांदीच्या अनेक वस्तू आहेत. लहानशा जागेत उभा केलेला, हा वस्तूंचा संसार पाहून थक्क व्हायला होते.

या संग्रहात पाहणाऱ्यांकडून ही भर पडत गेली. अनेकांनी गिरीशजींना त्यांच्याकडील काही खास पितळी वस्तू दिल्या आहेत. सामाजिक कार्यामुळे त्यांचा परिचय सर्वत्र आहे. त्यामुळे अगदी मोडीतली भांडी ज्यांच्याकडे येतात, त्यांच्यापासून अनेकांची वस्तू गोळा करण्यासाठी मदत होते.

गिरीश केवळ प्रदर्शन उभे करून थांबले नाहीत. या संग्रहात असलेल्यांपैकी अनेक वस्तू आजही उत्पादक तयार करतात. त्या तयार करणाऱ्यांचे संपर्क क्रमांकही त्यांनी तिथेच उपलब्ध केले आहेत. हेतू हा की, कुणाला ती हवी असतील, तर त्यांनी निर्मात्याशी थेट संपर्क साधून विकत घ्यावीत. त्यामुळे वस्तूंच्या निर्मात्यांनाही लाभ होतो, असे ते सांगतात. हा सकारात्मक दृष्टिकोन सुखावून जातो. ■ ■ ■

## बोगस अधिकारी बनून ज्वेलर्सला
# पावणे तीन कोटीने गंडवले
### संशयिताच्या खात्यात पैसे ट्रान्सफर

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** मुख्यमंत्री कार्यालयातील क्लास वन अधिकारी असल्याचे भासवून मुंबईतील एका नामांकित ज्वेलर्सला २ कोटी ८० लाख रुपयांचा चुना लावणाऱ्या एका ३२ वर्षीय तोतयाला लोकमान्य टिळक मार्ग पोलिसांनी अखेर बेड्या ठोकल्या.

वैभव परेश ठाकर असे त्या भामट्याचे नाव असून न्यायालयाने त्याला १२ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. त्याच्या या बतावणीने पोलिस यंत्रणाही चक्रावली आहे. आरोपी वैभव ठाकर याने फेब्रुवारी ते एप्रिल २०२४ दरम्यान ज्वेलर्सला कस्टम विभागाने जप्त केलेले सोने ७ टक्के कमी दरात लिलावात मिळवून देण्याचे आमिष दाखवले.

या आमिषाला बळी पडून ज्वेलर्सने १.१५ कोटी रुपये थेट आरोपीची पत्नी प्रियांका ठाकर हिच्या नावावर नोंदणीकृत असलेल्या गोल्ड ट्रेडिंग करणाऱ्या फर्मच्या खात्यात ट्रान्सफर केले. फेब्रुवारी ते एप्रिल २०२४ दरम्यान हा फसवणुकीचा प्रकार घडला. पोलिस तपासात आरोपीच्या धक्कादायक कृत्यांचा उलगडा झाला आहे. आरोपी ठाकरकडे बनावट सरकारी ओळखपत्र आढळले. तसेच पिवळ्या दिव्याची गाडी वापरत होता. विशेष म्हणजे त्याला मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानातही प्रवेश होता. त्याने मागील वर्षीच्या राज्य विधिमंडळ अधिवेशनाचा प्रवेश पासही मिळवला होता. तसेच त्याने एका आमदाराचा स्वीय सहायक असल्याचेही भासवले होते. आरोपीची पत्नी प्रियांका आणि या गुन्ह्यात सामील असलेल्या इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

## शाळा परिसरात गुटखा विक्रेत्यांवर
# 'मकोका'ची कारवाई होणार
### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत घोषणा



**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ९ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत माहिती दिली की, राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात पान, तंबाखू तसेच अंमली पदार्थ विकणाऱ्यांवर आता 'मकोका' (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) अंतर्गत कारवाई केली जाईल. कायद्यात बदल करून अशा प्रकरणात ोमोक्का लावण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यापूर्वी, गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी माहिती दिली होती की, अशा दुकानांना आणि पानटपऱ्या उद्धवस्त करण्याच्या सूचना सर्व महापालिका व नगरपालिकांना देण्यात आल्या आहेत. प्रशांत ठाकूर यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता, तर अभिमन्यू पवार आणि अस्लम शेख यांनी उपप्रश्न विचारले.

राज्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ६२ वसतिगृहे भाडेतत्त्वावर सुरू करण्यात आली आहेत, तर दहा ठिकाणी कायमस्वरूपी जागा दुग्ध विकास विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, अशी माहिती मंत्री अतुल सावे यांनी दिली. मनिषा चौधरी यांनी याबाबत प्रश्न विचारला होता.

मुंबई परिसरात भाडे दर वाढवून दिल्याने तिथेही लवकरच वसतिगृहे सुरू केली जातील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी ग्वाही दिली की, इतर मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्यात येतील.

महसूल विभागाने अशा जागा ओबीसी विभागाला हस्तांतरित केल्या असून, केवळ चार जिल्ह्यांमध्ये जागा मिळणे बाकी आहे. यात आपण स्वतः लक्ष घालून त्या उपलब्ध करून देऊ, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.




## नशा विरोधी संघर्ष अभियान

सनबर्न फेस्टिवल यावर्षी मुंबईत शिवडी येथे १९ ते २१ डिसेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे हा तथाकथित फेस्टिवत महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि अस्मिता यांना गालबोट लावणारा आहे. व्यसनाधीनता वाढवणाऱ्या अशा कार्यक्रमांवर कायमस्वरूपी बंदी घातायता हवी. पोलीस आणि अमली पदार्थविरोधी पथक यांनी आयोजकांवर सतत तक्ष ठेवायला हवे. युवा पिढीला अमती पदार्थांच्या गर्तेत ढकलणारा हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या भूमीत कधीही होता कामा नये. मुंबईत होणारा सनबर्न फेस्टिव्हत तत्काळ रद्द करा, अशी मागणी नशा विरोधी संघर्ष अभियानाने केली आहे.

यावेळी 'नशा विरोधी संघर्ष अभियानाच्या वतीने प्रा. श्रीपाद सामंत यांनी पत्रकारांना संबोधित केले. अभियानाच्या सदस्या सौ. धनश्री केळशीकर, कीर्ती महाविद्यालयाचे प्रा. विठ्ठल सोनटक्के, 'मोकळा श्वास फाउंडेशन'चे संयोजक राजेश सावंत, अधिवक्ता आशुतोष पांडे आणि हिंदू जनजागृती समितीच्या अधिवक्त्या मृण्मयी खोडवेकर उपस्थित होते

प्रा. श्रीपाद सामंत म्हणाले, सनबर्न फेस्टिव्हल च्या माध्यमातून युवा पिढीच्या आरोग्य व सुरक्षिततेस गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने मानवी हक्कांच्या संरक्षणार्थ तात्काळ हस्तक्षेप करण्याबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे तक्रारही दाखत केली आहे. विशेषतः या कार्यक्रमात अमली पदार्थांचा मोठ्या प्रमाणातील वापर व वितरण केल्याचे प्रकार यापूर्वीच्या कार्यक्रमांतून उघडकीस आले आहेत. Ketamine सहित विविध NDPS Act अंतर्गत प्रतिबंधित पदार्थ जप्त झाल्याची अधिकृत नोंद सुद्धा उपलब्ध आहे आयोगाने या प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन संबंधित शासकीय यंत्रणांना आवश्यक ती चौकशी, मार्गदर्शन व कारवाई करण्यास निदेश द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली. ■ ■ ■

## ..असा लागला शोध!
## शीतपेयांसाठीचे रेफ्रीजेरेटर

रेफ्रिजरेटरचा शोध टप्प्याटप्प्याने लागला, ज्यात डॉ. जॉन गोरी यांनी १८८० च्या दशकात पहिले व्यावहारिक रेफ्रिजरेशन यंत्र बनवले, त्यानंतर फ्रेड डब्ल्यू. वुल्फ यांनी १९१३ मध्ये पहिले घरगुती रेफ्रिजरेटर (फ्रीज) बनवले, आणि नंतर फ्रिगिडायरने १९२३ मध्ये पहिले स्वयंपूर्ण युनिट आणले, ज्यामुळे ते सामान्य लोकांपर्यंत पोहोचले आणि १९३० च्या दशकात 'फ्रीऑन' सारख्या वायूंच्या वापरामुळे हे तंत्रज्ञान अधिक विकसित झाले व बाजारात आले.

सुरुवातीच्या काळात डॉ. जॉन गोरी १८८० च्या दशकात, त्यांनी वैद्यकीय उपचारांसाठी बर्फ तयार करण्यासाठी एक यंत्र बनवले, जे रेफ्रिजरेशनच्या तत्त्वावर आधारित होते, असे मानले जाते. १८५४ मध्ये व्यावसायिक बर्फ बनवणाऱ्या पहिल्या यंत्राचा शोध लागला. १९१३: फ्रेड डब्ल्यू. वुल्फ यांनी पहिले घरगुती इलेक्ट्रिक रेफ्रिजरेटर (फ्रीज) बनवले, जे आईसबॉक्सच्या वर बसवलेले होते.१९१३ मध्ये मार्शल यांनी घरगुती रेफ्रिजरेटरचे पहिले पेटंट घेतले, पण ते मोठे आणि महागडे होते.



१९२३ मध्ये फ्रिगिडायर कंपनीने पहिले स्वयंपूर्ण आणि वापरण्यास सोपे रेफ्रिजरेटर युनिट बाजारात आणले, ज्यामुळे ते घराघरात पोहोचले.१९२० चे दशकात 'फ्रीऑन' सारख्या नवीन रेफ्रिजरंट्सच्या (शीतक) परिचयामुळे रेफ्रिजरेटरचे तंत्रज्ञान अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम बनले आणि १९३० च्या दशकात त्याची बाजारपेठ खूप वाढली.

थोडक्यात, रेफ्रिजरेटरचा शोध एकाच व्यक्तीने लावलेला नाही, तर अनेक शास्त्रज्ञ आणि संशोधकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे हळूहळू त्याचा विकास झाला. सुरुवातीला वैद्यकीय आणि व्यावसायिक वापरासाठी बनवलेले हे तंत्रज्ञान नंतरच्या काळात, विशेषतः फ्रिगिडायरसारख्या कंपन्यांनी, ते सर्वसामान्यांसाठी सोपे आणि परवडणारे बनवल्यामुळे घराघरात पोहोचले. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## महाराष्ट्रात थंडीचा कहर

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :** महाराष्ट्रात हिवाळ्याने पुन्हा जोरदार हजेरी लावली असून गारठा वाढू लागला आहे. राज्याच्या अनेक भागात थंडीचा कडाका इतका वाढला आहे की, सामान्य नागरिकांसह शेतकरी वर्गही मोठ्या अडचणीत येत आहे.

भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या ताज्या अंदाजानुसार, देशाच्या मध्य पट्ट्यासोबतच महाराष्ट्रात पुढील काही दिवस तापमान मोठ्या प्रमाणात घसरणार आहे. विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील नागरिकांना १० ते १२ डिसेंबर या कालावधीत तीव्र शीतलहरीचा सामना करावा लागणार असल्याचा इशारा दिला आहे.

## मद्याच्या नशेत मटनावरून मित्राचीच हत्या

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :** मद्य प्राशन केल्यानंतर मटणाच्या कारणावरून झालेल्या वादातून मित्रानेच मित्राचा चाकूने गळा चिरून खून केला. जरिपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बाराखोली परिसरात हा प्रकार घडला.

आदित्य मेश्राम (२२) रा. बाराखोली असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी तिन मारेकऱ्यांना अटक केली.अविष्कार नाईक, तुषार नक्के, प्रित बोरकर अशी आदित्यच्या मारेकऱ्यांची नावे आहेत. आदित्यचा तिनं दिवसांपूर्वीच तुषार सोबत मारामारी झाली होती. याच वादातून तुषार रागात होता. दरम्यान घटनेच्या रात्री आधी प्रित आणि अविष्कारने रात्री एकत्र मद्यपान केले. नंतर तुषार तिथे आला. हे तिघे मटनाचे जेवण घेऊन आले. बाराखोली परिसरात तिथे आदित्य त्यांना दिसला. या चौघांचे जुन्या वादातून पुन्हा एकदा भांडण झाले.

दरम्यान प्रित आणि अविष्कार या दोघांनी आदित्यला जबर मारहाण केली. त्यांनी आदित्यचा चाकूने गळा चिरून खून केला. घटनास्थळावरून पळालेले तिघेही बेझनबाग कॉलनीत पोहोचले. सुगावा लागताच जरिपटका पोलिसांनी रात्री दोन वाजता तिघांना अटक केली.

# बाबा आढावांसारखी माणसे पुन्हा या राज्यात होतील?

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. बाबा आढावांसारखी माणसं परत या राज्यात कधी होतील? माहित नाही, पण ती घडवण्याची शक्ती या भूमीत नक्की आहे, त्यामुळे अशी माणसं पुन्हा घडावीत हीच इच्छा, असे ते म्हणालेत.

बाबा आढाव यांचे सोमवारी रात्री वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या रुपाने संसदीय लोकशाहीचा एक खंदा समर्थक हरवला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे म्हणाले, ज्येष्ठ समाजसेवक आणि कष्टकऱ्यांसाठी संपूर्ण आयुष्य वेचलेल्या बाबा आढावांचं निधन झालं. महाराष्ट्राने या देशांत समाज प्रबोधनाचा सज्जड पाया घातला आणि सामाजिक कार्यकर्त्यांचं मोहोळ तयार केलं. त्यातलं एक अत्यंत महत्वाचं नाव बाबा आढाव.

बाबा आढाव हे पेशाने डॉक्टर. पण डॉक्टरकीचा व्यवसाय सोडून त्यांनी स्वतःला सामाजिक कार्यात ढकलून घेतलं. महाराष्ट्राचं हे एक वैशिष्ट्य की, सामाजिक क्षेत्रांत उत्तुंग कार्य केलेली माणसं, उच्चशिक्षित आणि जर त्यांनी त्यांच्या क्षेत्रांत करिअर करायचं ठरवलं असतं तर तितकीच मोठी कारकीर्द घडवू शकले असते.



राज ठाकरेंची श्रद्धांजली

अशी माणसं सामाजिक क्षेत्रांत आली आणि त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीला आकार दिला. हल्ली अशी माणसं तयार होत आहेत का? माहित नाही. हल्ली सामाजिक कार्यकर्ते म्हणून मिरवणारे, स्वतःचे फ्लेक्स लावणाऱ्यांचा सुळसुळाट आहे.

रिक्षा पंचायत असो, हमाल पंचायत असो की १९७२ साली एक गाव एक पाणवठासाठी उभी केलेली चळवळ असो, की १९६९ ला राज्यात मंजूर झालेला महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार कायदा असो, हे बाबांचं मोठं योगदान. बाबा आढावांनी संपूर्ण आयुष्य कष्टकरी, असंघटित कामगार आणि श्रमिकांच्या हक्कांसाठी संघर्ष उभा केला. आर्थिक उदारीकरणाच्या नंतरच्या काळात कामगारांचं आणि श्रमिकांच शोषण करणारी एक नवी व्यवस्था आता जन्माला आली आहे जिला सरकारचं समर्थन आहे.

सध्या तर सरकारं ही उद्योगशरण आहेत आणि कामाचे तास, वेळा याबाबत सरकार उद्योगजगताला शिस्त देखील लावू शकत नाही, हे नुकत्याच विमान कंपनीच्या उदाहरणातून दिसलं. यामुळे संघटित असो की असंघटित कामगार किंवा नव्याने उदयाला येत असलेला ज्याला 'गिग वर्कर' म्हणता येईल असे सगळेच असुरक्षिततेच्या गर्तेत सापडले आहेत.